Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २७४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## 'आज तुम्ही सत्तेत आहात, उद्या नसाल...' SIR विरोधी सभेतून ममता बॅनर्जींचा मोदी सरकारवर हल्लाबोल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ कलकत्ता**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मालदा जिल्ह्यातील गाझोल येथे आयोजित डखठ विरोधी रॅलीमध्ये केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी केंद्राच्या धोरणांपासून ते स्थानिक समस्यांपर्यंत अनेक मुद्द्यांवर भाष्य केले आणि नागरिकत्वाशी संबंधित भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. ममता म्हणाल्या, 'घाबरू नका, मी असेपर्यंत एकही बंगाली ना डिटेन्शन कॅम्पमध्ये जाईल, ना बांग्लादेशात पाठवला जाईल.'

ममता बॅनर्जी पुढे म्हणतात, केंद्र सरकार राज्याला हक्काचा निधी देत नाही. ऋब्ढ नंतर आता सिगारेटचा करही केंद्र स्वतःकडे ठेवणार अशी माहिती आहे. राज्याने केंद्राकडे प्रकल्प पाठवले, मात्र निधी मिळत नाही. त्यांनी देशावर पूर्ण कब्जा केला आहे. हे आणीबाणीसारखेच आहे. आज तुम्ही सत्तेत आहात, पण उद्या नसाल. इगझ निधी अडवून आम्हाला हरवण्याचा प्रयत्न करत आहे, पण आम्ही मागे हटणार नाही.

**बीएलओंच्या मृत्यूंचा मुद्दा उपस्थित**

सीएम बॅनर्जी यांनी अनेक राज्यांमधील बीएलओंच्या मृत्यूंचा प्रश्न उचलला. त्यांनी सांगितले की, मध्य प्रदेशात ९, तर उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि बंगालमध्येही बीएलओंच्या मृत्यूच्या घटना नोंदल्या गेल्या आहेत. लोकांना यातना सोसाव्या लागत आहेत. निवडणुकीपूर्वी इतकी घाई का? डखठ प्रक्रियेवर नागरिकांमध्ये वाढत्या चिंतेवर ममता म्हणाल्या की, अनेक सर्व्हर बंद आहेत आणि लोकांना धमक्या दिल्या जात आहेत.

**आम्हाला भाजपकडून हिंदुत्व शिकायची गरज नाही**

सभेत ममता बॅनर्जी यांनी धर्म आणि सांप्रदायिकतेचा मुद्दा उपस्थित करत भाजपावर आरोप केला की, ते समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी केंद्राच्या वक्फ कायद्याचा विरोध असल्याचे सांगितले आणि म्हटले की, धार्मिक स्थळांवर हात घालू देणार नाही. बांग्ला बोलणाऱ्यांना बांग्लादेशी म्हणणे म्हणजे अपमान आहे. डखठ पासून घाबरू नका. गृह मंत्री अमित शाह यांची ही चाल आहे, पण ते यशस्वी होणार नाही. मी आहे तोपर्यंत तुमच्यावर कोणतीही कारवाई होऊ देणार नाही, असेही ममता यावेळी म्हणाल्या.

## मित्र पक्षावर विश्वास नाही; ईव्हीएम मशीनवर लक्ष ठेवण्यासाठी उमेदवारांचा खासगी पाहारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ छत्रपती संभाजीनगर**



राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडला आहे. न्यायालयाच्या आदेशानं वीस डिसेंबर रोजी दुसरा टप्पा पार पडेल, त्यानंतर एकवीस डिसेंबर रोजी एकत्रित मतमोजणी होईल. त्यामुळं पुढील सतरा दिवस ईव्हीएम मशीन सांभाळण्याची जबाबदारी पोलीस आणि सरकारी यंत्रणेवर येऊन पडली आहे. असं असलं तरी निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या उमेदवारांनी आपल्या कार्यकर्त्यांचा पाहारा देखील लावला आहे. प्रत्येक आठ तासाला दोन उमेदवार स्ट्राँग रूमभोवती पाहारा देणार आहेत. विशेषतः बहुतांश ठिकाणी महायुतीमधील घटकपक्ष एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढत असून त्यांना एकमेकांवर विश्वास नाही, निवडून येण्यासाठी लढलो, अशी भावना नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांनी व्यक्त केली.

दोन डिसेंबर रोजी राज्यातील नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकांची मतदान प्रक्रिया पार पडली असून २१ डिसेंबर रोजी मतमोजणी पार पडणार आहे. त्यामुळं सर्व ठिकाणच्या ईव्हीएम मशीन स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आल्या आहेत. त्याठिकाणी जिल्हाप्रशासनासोबत पोलीस यंत्रणा देखील सुरक्षेसाठी सज्ज झाली आहे. तीन पाळीमध्ये तगडा बंदोबस्त लावण्यात आला असल्याची माहिती, खुलताबाद पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी दिली. प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे देखील लावण्यात आले असून वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक पाहणीसाठी वेळोवेळी येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनानं सुरक्षा यंत्रणा सज्ज केली असली, तरी निवडणूक लढणाऱ्या नगराध्यक्ष पदांच्या उमेदवारांनी आपला खासगी पाहारा देखील लावला आहे.

## १० कोटींचा खर्च फक्त सात दिवसांसाठी ! महाराष्ट्र हिवाळी अधिवेशन असणार ८ ते १४ डिसेंबर पर्यंत




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर**

राज्यातील विधानमंडळाची हिवाळी अधिवेशन नागपूर येथे ८ डिसेंबरपासून १४ डिसेंबरपर्यंत पार पडणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या निर्णयाची सूचना दोन्ही सभागृहांच्या व्यवसाय सल्ला समितीने आज दिली. हिवाळी अधिवेशनाचा कालावधी हा ८ डिसेंबर ते १४ डिसेंबर असणार आहे. सुरुवातीला दोन आठवडे हिवाळी अधिवेशन होईल, असे जाहीर झाले होते. मात्र, रविवारी कामकाज ठेवून हिवाळी अधिवेशन कालावधी फक्त एका आठवड्याचा ठेवण्यात आला आहे.

महाराष्ट्र हिवाळी अधिवेशन २०२५ साठी अंदाजे ९० कोटी रुपये खर्च होणार आहे. हे अधिवेशनासाठी पूर्वतयारी जसे कि मंत्र्यांचे, आमदारांचे आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे निवास, कार्यालय दुरुस्ती व सजावट या कामांसाठी नमूद करण्यात आले आहे. आणि ४० लाख हे आमदार, खासदार आणि त्यांच्या पीएच्या जेवणासाठीच खर्च होतील.

अधिवेशनाचे स्वरूप साप्ताहिक असून, प्रमुख विधिमंडळीय कामकाज, विभागीय पुनरावलोकन आणि राज्यातील महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा यांचा समावेश असेल. विधानसभेचे दोन्ही सभागृह विधानसभा आणि विधान परिषद या अधिवेशनात सहभागी होतील.

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चालू आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाची आचारसंहिता २१ डिसेंबरपर्यंत लागू राहणार आहे. याचा परिणाम म्हणून ८ डिसेंबरपासून सुरु होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात होणाऱ्या घोषणांवर मर्यादा येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

यावेळी राज्यातील शेतकरी, महागाई, बेरोजगारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न, सामान्य लोकांच्या समस्यांवर चर्चा अपेक्षित आहे. विरोध पक्षांनी विशेष शेतकरी आत्महत्या, पावसामुळे झालेले नुकसान अशा मुद्यांकडे लक्ष वेधण्याची अपेक्षा आहे.

अधिवेशनासाठी नागपूरमध्ये विविध प्रशासकीय व्यवस्था आणि सुरक्षा यंत्रणा तयार करण्यात येत आहेत. वाहतूक, निवास व्यवस्था, इंटरनेट-टेलिफोन सुविधा, आरोग्य व अग्निशामक यंत्रणा यांचे नियोजन चालू आहे.

## उच्च न्यायालयाचा राज्य निवडणूक आयोगाला झटका : निकाल वेगळे जाहीर करण्यास बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर**




उच्च न्यायालयामधील याचिका लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने २ डिसेंबर रोजी मतदान झालेल्या जिल्हा न्यायालयातील अपिलांशी संबंधित नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकीचा निकाल २० डिसेंबर रोजी होणाऱ्या संबंधित निवडणुकीसोबत २१ डिसेंबरला जाहीर केला जाईल, असा निर्णय १ डिसेंबर रोजी घेतला होता. तसेच, इतर नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकीचा निकाल ३ डिसेंबरलाच जाहीर होईल, असे स्पष्ट केले होते. उपसचिव के. सूर्यकृष्णमूर्ती यांनी या निर्णयाची प्रत आयोगाचे वकील ॲड. अमित कुकडे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात सादर केली असता याचिकाकर्त्यांनी त्यावरही आक्षेप घेतला. त्यामुळे न्यायालयाने हा निर्णय अयोग्य ठरवून सर्वांचे निकाल एकाच दिवशी जाहीर करणे आवश्यक असल्याचे न्या. अनिल किलोर आणि रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने बजावले.

वर्धा येथील परवेझ हसन खान व प्रदीपसिंग ठाकूर, देवळी येथील उमेश कामडी, मिलिंद ठाकरे व अमोल काकडे, वरोरा येथील सचिन चुटे, गोंदिया येथील शकील हमीद मंसुरी आणि भंडारा येथील अश्विनी नरेंद्र बुरडे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. ते सर्व २० डिसेंबरची निवडणूक लढणार आहेत. त्यांना निवडणूक चिन्हांचे वाटप झाले असून, त्यांनी आपापल्या चिन्हांचा प्रचारही केला आहे. त्यावर मोठा खर्च झाला आहे. परिणामी, त्यांचे चिन्ह बदलले जाऊ नये, अशी एक मागणीही या याचिकांद्वारे न्यायालयाला करण्यात आली आहे.

**आचारसंहिता निकालापर्यंत लागू राहील**

या निवडणुकीची आचारसंहिता निकाल जाहीर होतपर्यंत म्हणजे, २१ डिसेंबरपर्यंत लागू राहील. तसेच, २० डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीचा कालावधी संपल्यानंतर अर्ध्या तासापर्यंत कोणालाही कोणत्याही माध्यमाद्वारे एक्झिट पोल प्रसिद्ध करता येणार नाही, असे निर्देशदेखील उच्च न्यायालयाने दिले. याशिवाय, राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावून याचिकांमधील उर्वरित मुद्द्यांवर येत्या १० डिसेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले. याचिकाकर्त्यांच्या वतीने वरिष्ठ ॲड. फिरदौस मिर्झा, ॲड. आनंद देशपांडे, ॲड. एम. अनिलकुमार, ॲड. ए. एम. काझी, आदींनी कामकाज पाहिले.

## हा निवडणूक आयोगाचा घोळच, उमेदवारांचा भ्रमनिरास ; महसूलमंत्री बावनकुळे यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर**

नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूकांचा निकाल लांबणीवर गेल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात निवडणूक आयोगाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. निवडणूक आयोगाच्या घोळामुळे नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचे निकाल आता लांबणीवर गेले आहेत. ज्या ठिकाणचे खटले न्यायालयात प्रलंबित होते, फक्त त्याच ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलायला पाहिजे होत्या. मात्र चुकीच्या पद्धतीने निवडणुका पुढे ढकलल्यामुळे आता सर्वच निकाल लांबले आहेत, असे बावनकुळे म्हणाले. नागपुरात ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



या प्रकारामुळे उमेदवार व कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास झाला असून याला सर्वच पक्षांच्या नेत्यांचा विरोध आहे. राज्य सरकारने अनेकदा निवडणूक आयोगाशी चर्चा केली व पत्रव्यवहारदेखील केला. परंतु आयोगाने कुठलीही दखल घेतली नाही. हा घोळ अनाकलनीय आहे. येणाऱ्या निवडणुका मोठ्या आहेत, त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने हा घोळ संपवावा. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य निवडणूक आयोगाकडून अहवाल मागितल्याची माहिती आहे. आयोगाने जे चुकीचे झाले ते दुरुस्त केलेच पाहिजे. राज्याच्या जनतेस वेठीस धरणे योग्य नाही. राज्य निवडणूक आयोगाला कोणी सल्ला दिला हे माहित नाही. आम्ही २५ वर्षांपासून निवडणुका लढवत आहोत, परंतु असा घोळ कधीच पाहिला नाही. राज्य निवडणूक आयोग पहिल्यांदाच अशी चूक करताना दिसत आहे, त्यामुळे आमची तीव्र नाराजी असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य शासनाचा यात हस्तक्षेप असल्याचा आरोप विरोधकांतील काही जण करीत आहेत. मात्र राज्य निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था आहे. यात आमचा कोणताही हस्तक्षेप नाही. प्रत्येक गोष्टीत राजकारण करणे योग्य नाही, असे बावनकुळे म्हणाले.

## अमरावती रेल्वे स्थानक स्थलांतर प्रस्तावाविरोधात खासदार बळवंत वानखडे आक्रमक

### रेल्वेमंत्रींकडे उच्चस्तरीय चौकशी व स्थानक कायम ठेवण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावतीचे लोकसभा खासदार बळवंत वानखडे यांनी अमरावती रेल्वे स्थानक हटवून इतरत्र स्थलांतर करण्याच्या प्रस्तावाचा तीव्र निषेध नोंदवत आक्रमक पवित्रा घेत आज केंद्रीय अश्विनी वैष्णव रेल्वेमंत्री यांना सविस्तर प्रत्यक्ष पत्र देऊन तत्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. विद्यमान स्थानक हटविण्याचा प्रस्ताव हा भूमाफियांना फायदा करून देण्यासाठी रचलेले कटकारस्थान असल्याच्या तक्रारींची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशीही मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी केली.

खासदार बळवंत वानखडे यांनी पत्रात म्हटले आहे की, अमरावतीचे ब्रिटिशकालीन रेल्वे स्थानक हे शहराच्या आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासाचे केंद्र असून ते हटविण्याचा कोणताही प्रस्ताव अमरावतीच्या जनभावनांविरुद्ध आहे. काही लोकप्रतिनिधींनी व्यापारी प्रकल्पासाठी रेल्वेची जमीन मुक्त करण्याच्या उद्देशाने स्थानक स्थलांतर पुढे रेटत असल्याचे गंभीर आरोप त्यांनी नोंदवले आहेत.

गेल्या काही महिन्यांत खासगी स्ट्रक्चरल ऑडिट, उड्डाणपुलाचे अचानक बंदकरणे, दुरुस्तीला विलंब, व परिणामी नागरिकांना निर्माण झालेला वाहतूक गोंधळ-या सर्व घडामोडी स्थानक हटविण्याचा मार्ग मोकळा करण्याचाच भाग असल्याचा संशय खासदारांनी व्यक्त केला.

**खासदारांनी रेल्वेमंत्र्यांकडे केलेल्या प्रमुख मागण्या**

१. अमरावती रेल्वे



स्थानक स्थलांतराचा प्रस्ताव तात्काळ रद्द करावा. २. सदर प्रस्तावामागील प्रक्रिया, अधिकारी, सल्लागार व हितसंबंधांची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करावी. ३. वाहतुकीला महत्त्वाचा असलेला स्थानक चौक-राजकमल चौक उड्डाणपुलाचा दुरुस्तीकारभार तातडीने सुरू करावा. ४. अमरावती रेल्वे स्थानकाचा विस्तार, नवीन गाड्या, यार्ड विकास व प्रवासी सुविधांसाठी विशेष योजना मंजूर करावी. ५. रेल्वेची जमीन कमी करून कोणत्याही प्रकारचा व्यापारी प्रकल्प होणार नाही, याची लेखी हमी द्यावी.

या पूर्वी मा. नितीन गडकरी यांना खा. बळवंत वानखडे नी भेटू पत्र आणि चर्चा करून सदर पूल सेतूबंध योजने मधून राज्य शासनाकडून प्रस्ताव केंद्र सरकार कडे पाठवण्या करण्यासाठी विनंती केली होती.

या प्रकरणात केंद्रीय मंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करून जनभावनांचा आदर करावा, अशी अपेक्षा खासदारांनी व्यक्त केली आहे.खासदार बळवंत वानखडे यांनी स्पष्ट केले की अमरावतीचे नागरिक, उद्योजक, विद्यार्थी, व्यापारी आणि सामाजिक संस्थांचा एकमताने विरोध असून, स्थानकाला हात लावण्याचा कोणताही प्रयत्न जनतेला मान्य होणार नाही असे केंद्रीय रेल्वे मंत्री यांना प्रत्येक भेटू सांगितले. रेल्वे मंत्री वैष्णवी वैष्णव यांनी सुद्धा कोणत्याही परिस्थितीत रेल्वे स्थानक स्थलांतर होणार नाही याची ग्वाही दिली.

संपादकीय ......

# आयोग शुद्धीकरणाचा योग!

राजकीय गोंधळ आपल्याला नवा नाही. उलट तो सवयीचा झाला आहे. या जोडीलाच आता निवडणूक आयोगाच्या गोंधळाचीही सवय करून घ्यावी लागेल, असेच सांप्रतचे चित्र! आधीच सदोष मतदार याद्यांच्या आधारे निवडणूक प्रक्रिया राबवल्याचा आरोप आयोगावर सातत्याने होत आहे. त्यात आता महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २० ठिकाणच्या निवडणुका आयोगानेच पुढे ढकलल्या आणि नवा गोंधळ घातला. मुळात आपले काम पूर्णवेळ नसते, निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतरच आपले हंगामी काम सुरू होते, असा समज निवडणूक आयोगाचा झालेला असावा. निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रक्रियेला पुरेसा वेळ द्यावा लागतो. उमेदवारी अर्ज दाखल करणे, त्यांची छाननी, अर्ज माघार, हरकतींवर निर्णय घेणे, यांचे टप्पे निश्चित असले, तरी त्यामधील कालावधी फारच कमी असतो.

यावेळच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये या कमी कालावधीमुळेच अडचणी निर्माण झाल्या. एखाद्याचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवला, तर त्या विरोधात न्यायालयात जाण्याची मुभा उमेदवाराला असते. न्यायालयीन प्रक्रियेला थोडा तरी वेळ लागतो, तरीही अवघ्या तीन-चार दिवसांत न्यायालयातून निकाल लावून आणावा, अशा अपेक्षेने ठिकठिकाणच्या निवडणूक निर्णय अधिकार्यांनी आपापल्या आकलनानुसार तीन ते चार दिवसांचाच अवधी अपिलांसाठी दिला. न्यायालयाला दुसरी बाजू ऐकून घेतल्याशिवाय निर्णय देता येत नाही. या प्रक्रियेला किमान दहा ते बारा दिवस लागू शकतात, हे माहीत असूनही निवडणूक निर्णय अधिकार्यांनी उमेदवारांना न्यायालयाच्या नव्हे, तर आपल्या हिशेबानुसारच अवधी दिला आणि एका गोंधळाचीच जणू तजवीज केली. आता अपिलांत २३ नोव्हेंबर किंवा त्यानंतर निर्णय आलेल्या २४ नगराध्यक्षपदे आणि १५४ नगरसेवकपदांची निवडणूक आयोगाने सरळ लांबणीवर टाकली आणि त्यांच्या मतदानाचा मुहूर्त ३ डिसेंबरवरून २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलला. एकाच निवडणुकीत मतदानाचे दोन मुहूर्त काढण्याचे ना न्यायालयाचे आदेश होते ना तशी गरज होती. हा अधिकारी पातळीवरचा अगोचरपणा आता असा नडला की, ३ डिसेंबरच्या मतदानाच्या निकालाचा मुहूर्तही मग २० डिसेंबरच्या मतदानासोबत घेण्याचे फर्मान उच्च न्यायालयाला काढावे लागले. यात झाले असे की, एक सुरू झालेली निवडणूक प्रक्रिया खंडित झाली. पुढे ढकललेल्या जागांच्या निवडणुकांसाठी सुधारित प्रक्रिया राबवणे आले. तेथील उमेदवारांचा वेळ, खर्च आणि त्रासही वाढला. या उमेदवारांना मतदारांपर्यंत पुन्हा पोहोचावे लागेल.पुन्हा कार्यकर्ते जमवण्याचा आटापिटा करावा लागेल. उमेदवार पुन्हा दारात उभा पाहून मतदार खूश होतीलच असे नाही. त्यांनाही फुकटचा मनस्ताप! बरे, या मतदारांपैकी २ डिसेंबर रोजी ज्यांनी नगराध्यक्षपदासाठी मतदान केले, त्यांना पुन्हा २० डिसेंबरला मतदान केंद्र गाठून नगरसेवकपदाच्या उमेदवाराला मतदान करावे लागेल. त्यासाठी पुन्हा सुट्टी काढावी लागेल. बाहेरगावच्या मतदारांनी नगराध्यक्षपदाच्या उमेदवारासाठी मतदान केले ते पुन्हा नगरसेवकपदाच्या मतदानासाठी पदरमोड करून मतदानाला का जातील? मतदारांत कमालीचा निरुत्साह निर्माण करण्याचाच हा कार्यक्रम! याआधी दुबार आणि सदोष मतदार यादीचा घोळ निस्तरताना नाकीनऊ आले. आयोगाने आपले हात झटकले. यादी तयार करणार्या यंत्रणांवर आयोगाने ठपका ठेवला. हे लक्षात घेता आताच्या गलथान कारभाराची जबाबदारीही राज्य निवडणूक आयोग घेणार नाहीच. सरकारच्या अन्य यंत्रणांमध्ये असा भोंगळ कारभार असेल, तर त्या विभागातील अधिकार्यांवर किमान कारवाई केली जाते. तसे निवडणूक आयोगातील जबाबदार अधिकार्यांवर ठपका ठेवला जात नाही. त्यामुळे प्रक्रियेत ढिलाई झाली, तरी त्याची संबंधितांना पर्वा नसते.

जगातील अनेक देशांमध्ये लोकशाही आहे. तिथेही वर्षानुवर्षे निवडणुका होतात; पण तेथे निवडणूक आयोगाचे काम अत्यंत पारदर्शी असते. अमेरिकेत तर वर्षभर या ना त्या निवडणुका सुरू असतात. त्या ठरलेल्या तारखांनाच निर्वेधपणे पार पडतात. तेथे मतपत्रिकेसोबतच ई-मेलवरून मतदान होते; पण कोणताही गोंधळ होत नाही. क्वचित प्रसंगीच आणि तेही अत्यंत रास्त कारण असेल, तरच प्रक्रियेविरोधात उमेदवार न्यायालयात जातो. न्यायालयाच्या निर्णयाचा कालावधी गृहीत धरूनच तारखा निश्चित केलेल्या असतात. ऐनवेळी त्या पुढे ढकलल्या जात नाहीत. आपल्याकडे मात्र 'आले आयोगाच्या मना' असा कारभार आहे. त्यातून निवडणुकीला अवघे काही तास शिल्लक असताना काही ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय आयोग घेतो, हे अनाकलनीय आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या नेत्याने आयोगाच्या कारभारावर व्यक्त केलेली नाराजी अधिक गंभीर ठरते.घटनात्मक यंत्रणेवर वा पदावर टीका करणे हा मुळात फडणवीस यांचा पिंड नाही; मात्र आयोगाचा स्थानिक गोंधळ पाहून त्यांचाही संयम सुटला. निकालाचा आणि कायद्याचा चुकीचा अर्थ लावून निवडणुका अचानकपणे पुढे ढकलणे चुकीचे असल्याचे मत फडणवीस यांनी नोंदवले. सत्ताधार्यांकडून निवडणूक आयोगाच्या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त होणे, हे पहिल्यांदाच घडले. विरोधकांचा तर आयोगावर भरवसाच उरलेला नाही. आता तर सत्तेतील सर्वच पक्षांनीही आयोगाला घेरलेले दिसते. हे तसे अवलक्षण म्हणायचे आणि आयोगानेच ते ओढवून घेतले. स्थानिक स्वराज्य संस्थांतील ओबीसी आरक्षणावरून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यामुळे निवडणुका लांबल्या. त्या एक-दोन महिने नव्हे तब्बल तीन वर्षे रखडल्या. न्यायालयाचा निर्णय कधीही येऊ शकतो, हे गृहीत धरून आयोगाने पूर्वतयारी करणे अपेक्षित होते; पण ती न करता आयोगाने निवडणूक प्रक्रिया अक्षरशः रेटून नेली. या कारभाराने सरकारला खर्चात तर टाकलेच शिवाय संबंधित घटकांनाही वेठीस धरले. हा प्रकार यापुढे घडू नये. त्यासाठी दुबार मतदार असलेल्या याद्या शुद्ध करण्याआधी निवडणूक आयोगाच्याच यंत्रणेचे शुद्धीकरण आवश्यक आहे. खुद्द आयोगानेच ही मोहीम हाती घेणे इष्ट!

# पीकविम्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

## रब्बी हंगामासाठी : हरभरा पिकाचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती** : विविध नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात सुधारित प्रधानमंत्री पीकविमा योजना राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम २०२५ हरभरा पिकासाठी अर्ज करण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अधिसूचित पिकाकरिता ही योजना असली, तरी यात फक्त हरभरा पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनाच विमा काढता येणार आहे.




पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक कीड व रोगाचा प्रादुर्भाव इत्यादी कारणामुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळाच्याउंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळातील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात योजनेंतर्गत नुकसानभरपाई मिळणार आहे.

प्रधानमंत्री पीकविमा रब्बी हंगाम २०२५ साठी जिल्ह्यातील देवरी, सडक अर्जुनी, तिरोडा, अर्जुनी मोरगाव येथील अधिसूचित पिकाकरिता फक्त हरभरा पिकासाठी शेतकऱ्यांना पीक विम्यात लाभ मिळणार आहे.तेव्हा शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन पीक संरक्षित करावे, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी रूपेश मेश्राम यांनी केले

### ९० रुपये प्रतिहेक्टर विमा दर

पीकविमा काढण्यासाठी जिल्ह्याकरिता भारतीय कृषी विमा कंपनी लि. मुंबई ही राहणार असून, हरभरा पिकाकरिता विमा संरक्षित रक्कम ३६ हजार रुपये असून विमा हप्ता दर ९० रुपये प्रतिहेक्टर आहे. तर शेतकऱ्यांनी अधिक माहितीकरिता कृषी विभागाच्या क्षेत्रीय पातळीवर काम करणारे सहा. कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा संबंधित विमा कंपनीचे प्रतिनिधी यांच्याशी साधवा.




## रुमालात ठेवा कापराचा लहान तुकडा – ऑक्सिजन तर वाढेलच, मिळतील 'हे' फायदे



दि.३विदर्भ प्रजासत्ताक३

थंडी, धूळ, प्रदूषण आणि सततचा ताण या सगळ्यांचा परिणाम आपल्या श्वसनावर, शरीरावर सहज होतो. अशा वेळी एक छोटा, साधा उपाय अनेकांना आराम देतो तो म्हणजे रुमालात थोडा कापूर ठेवून फिरणे. कापूर हे भारतीय संस्कृतीतील अत्यंत परिचित आणि उपयोगी घटक आहे. त्याचा सुगंध जसा ताजेतवाना करतो, तसाच त्याचा आरोग्यावरही सूक्ष्म आणि सकारात्मक परिणाम होतो.

कापूराचा सुगंध हवेत क्षणात पसरतो आणि श्वसनमार्ग स्वच्छ करतो. नाक बंद होण्याची प्रवृत्ती, धूळ किंवा थंड वाऱ्यामुळे होणारी जडत्वाची भावना कमी करण्यासाठी हा सुगंध सौम्यपणे मदत करतो. दिवसभर बाहेर फिरताना किंवा प्रवास करताना कापूराचा तुकडा जवळ असणे म्हणजे वातावरणातील घाणेरडे वास, धूर कमी करणारा छोटासा आधार. काही लोकांना थकवा जाणवला, अचानक चक्कर आली किंवा मनावर ताण आला तरही कापूराचा तीव्र पण स्वच्छ सुगंध सहज उभारी देतो. त्यामुळे रुमालात ठेवलेला कापूर हा एक प्रकारे मानसिक आणि श्वसनात्मक दोन्ही बाजूंनी फायदा देतो. श्वसनासाठी कापूर फार उपयुक्त असतो.

कापूर हा नैसर्गिकरित्या जंतुनाशक गुणांनी परिपूर्ण आहे. तो सहज हवेत पसरतो, त्यामुळे त्याचे कण हवेतील सूक्ष्म कीटक आणि दुर्गंधींवर परिणाम करतात. याच कारणामुळे घरात, देवघरात किंवा मुलांच्या खोलीत कापूर ठेवण्याची किंवा जाळण्याची परंपरा आहे. त्यातून मिळणारा सुगंध वातावरण शुद्ध करतो आणि घरात एक सकारात्मक, शांत ऊर्जा निर्माण करतो. आयुर्वेदिक दृष्टिकोनातून कापूर कफ-नाशक मानला जातो. त्याची थंड आणि स्वच्छ करणारी प्रवृत्ती मनातील ताण कमी करते, एकाग्रता वाढवते आणि बेचैनीवर नियंत्रण आणते.

दैनंदिन आयुष्यात कापूराची उपयुक्तता अनेक प्रकारे दिसते. सर्दी-खोकल्याच्या त्रासापासूनही कापूर आराम देतो. ज्यामुळे कफ सुटतो आणि श्वास घेणे सोपे होते. काही जण घरात कापूर जाळून हवेतली ओलसर दुर्गंधी दूर करतात आणि कीटकांना दूर ठेवतात. स्नायूंमध्ये वेदना असेल तर कापूरयुक्त तेलाचा सौम्य मसाज आराम देतो. कापराचे तेल डोक्याला लावणे आरामदायी असते. तसेच लहान मुलांच्या डोक्यातील उवा कमी करण्यासाठी हे तेल एकदम उपयुक्त ठरते.

# रांगडा कांद्याचे उभे पीक असताना खताचे नियोजन कसे करावे

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

रांगडा कांद्याचे उभे पीक म्हणजे शेतात लागवड केलेले, वाढीच्या अवस्थेतील पीक, ज्यासाठी काही विशिष्ट पोषण आणि संरक्षण उपायांची आवश्यकता असते. या अवस्थेत काय काळजी घ्यावी लागते, ते पाहुयात...

**रांगडा कांद्याचे उभे पीक**

नत्र खताचा पहिला हप्ता १० किलो प्रति एकर या प्रमाणात पुनर्लागवडीनंतर ३० दिवसांनी द्यावा.

पुनर्लागवडीनंतर ४० ते ६० दिवसांनी खुरपणी करावी.

नत्र खताचा दुसरा हप्ता १० किलो प्रति एकर या प्रमाणात पुनर्लागवडीनंतर ४५ दिवसांनी द्यावा.

पुनर्लागवडीनंतर ४५, ६० आणि ७५ दिवसांनी फवारणीद्वारे सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-।। ५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात द्यावे. नत्राच्या कमतरतेमुळे पाने पिवळी पडली असल्यास, युरिया




१० ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. पर्णीय रोग व कीड नियंत्रणाकरिता, फवारणी (प्रमाण प्रति लिटर पाणी) पुनर्लागवडीच्या ३० दिवसांनंतर मॅन्कोझेब २.५ ग्रॅम अधिक फिप्रोनिल १ मिली

पुनर्लागवडीच्या ४५ दिवसांनंतर ट्रायसाक्लॅझोल १ ग्रॅम / प्रोपीकोनॅझोल १ मिली अधिक कार्बोसल्फान २ मिली पुनर्लागवडीच्या ६० दिवसांनंतर हेक्झाकोनॅझोल १ मिली / कॉपर ऑक्सिक्लोराईड २.५ ग्रॅम अधिक प्रोफेनोफॉस १ मिली फवारणी करताना द्रावणात चिकट द्रव्याचा ०.६ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे वापर करावा.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी.

# महावितरणकडून कृषिपंपांसाठी नवीन धोरण शेतकऱ्यांना मिळणार आता दिवसा वीज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**

महावितरणकडून कृषिपंपांसाठी दिवसा वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सौरऊर्जेवर तातडीने कनेक्शन देण्याचा नवीन धोरण राबविला जात आहे.

सध्या पारंपरिक विद्युत खांबांवरून वीजपुरवठा थांबविला असून, त्याऐवजी स्वस्त पर्याय म्हणून सौरऊर्जेवर प्राधान्य देण्यात येत आहे. ही माहिती महावितरण कार्यालयातून देण्यात आली.

दोन हजार ७७३ मेगावॅट क्षमतेचे ५१२ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केले आहेत, असेही महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. महावितरणने त्याच्या दीर्घकालीन वीज खरेदी करारांमध्ये अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचे महत्त्व वाढवीत ६५ टक्के पर्यंत सौर आणि इतर नव्याने विकसित ऊर्जा स्रोतांचा समावेश केला आहे.महावितरणच्या सूक्ष्म नियोजनामुळे कोठेही भारनियमन न करता संपूर्ण राज्यात विक्रमात्मक २६ हजार ४९५ मेगावॅट विजेचा सुरळीत पुरवठा सुरू आहे.




महावितरणकडून एआय तंत्राचा वापर मागणीचा अंदाज लावण्यासाठी महावितरणने विद्युत आणि वीज खरेदीचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित स्वतंत्र प्रणाली विकसित केली आहे.

या आधुनिक प्रणालीच्या माध्यमातून मागणीचा अचूक अंदाज घेऊन सर्वात कमी खर्चात वीज पुरवठा शक्य होत आहे, त्याऐवजी स्वस्त पर्याय म्हणून सौरऊर्जेवर प्राधान्य देण्यात येत आहे. ही माहिती महावितरण कार्यालयातून देण्यात आली.असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# चिखलदऱ्यात रेकॉर्ड ब्रेक ८५ टक्के मतदानयुवकांचा मोठा प्रतिसाद

## नगरसेवक ४५ व तीन नगराध्यक्षांसाठी उमेदवारांचे नशीब मशीन बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३चिखलदरा**चिखलदरा नगरपालिकेत ३३०० मतदार असून सायंकाळपर्यंत सुमारे ८५ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदारांनी चिखलदरा नगरपालिकेत प्रचंड प्रतिसाद दाखवला. दुपारपर्यंत मोठ्या प्रमाणात या ठिकाणी मतदान झाले होते. नवीन युवकांनी सुद्धा मतदानाचा हक्क बजावला, चिखलदरा नगरपालिका ही क दर्जाचे नगरपालिका असून महाराष्ट्रातील सर्वात कमी मतदारअसणारी नगरपालिका आहे.

चिखलदरा पर्यटन स्थळ असल्यामुळेया ठिकाणी नगरपालिका दर्जा मिळाला असून प य ॅ ट न स्थ ळ असल्यामुळेयानगरपालिकेला महत्त्व आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे निवडणुकीवर लक्ष आहे. कारण, खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या निवडणुकीवर लक्ष ठेवून आहेत. यासह त्यांचे मामेभाऊ अल्हाद कलोती या ठिकाणावरून नगरसेवकांसाठी अविरोध झाले आहेत त्यामुळे ही नगरपालिका प्रतिष्ठेची होणार आहे.

दुपारपर्यंत चिखलदरा नगरपालिकेत मोठ्या प्रमाणात मतदान झाले असून संपूर्ण मतदान शांततेत पार पडले आहे. या नगरपालिकेत नगरसेवकासाठी एकूण ४५ उमेदवार उभे होते. तर नगराध्यक्षासाठी तीन लोक उभहोते. त्यामध्ये प्रामुख्याने भाजपाकडून राजेंद्रसिह सोमवंशी, काँग्रेसकडून शेख अब्दुल शेख हैदर, प्रहार कडून सविता



गावंडे तर नगरसेवकांसाठी काँग्रेसकडून एकूण १९ नगरसेवकांसाठी उमेदवार उभे होते. भाजपाकडून एकोणवीस पैकी एक उमेदवार अविरोधझाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मामेभाऊ अल्हाद कलोती हे प्रभाग क्रमांक १० मधून अविरोध झाले आहेत. तर प्रहार कडून सहा राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून एक तर एक अपक्ष असे उमेदवार उभे होते. काही ठिकाणी तणावाचे वातावरण असले तरी चिखलदरा नगरपालिकेची निवडणूक ही शांततेत पार पडली. सर्वच उमेदवारांचे नशीब आता मशीन बंद झाले असून सर्वांना निवडणुकीच्या निकालाची प्रतीक्षा आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ३ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# जिल्ह्यात सरासरी ६८.३८ टक्के मतदान

## चिखलदऱ्यात सर्वाधिक ८५.२३ टक्के



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ अमरावती –** जिल्ह्यातील दहापैकी नऊ नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी काही तुरळक घटना वगळता उत्साहाने व शांततेत मतदान पार पडले. सकाळी थंडीमुळे मंदावलेली मतदानाची गती दुपारनंतर वाढली. सकाळी ११.३० वाजेपर्यंत २१.३० टक्के तर दुपारी ३.३० वा. पर्यंत ४९.८० टक्के तर दिवसअखेर ६८.३८ टक्के मतदारांनी मतदान केले. एकूण ३१२४३६ पैकी २१३६५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. विशेष म्हणजे अमरावती जिल्ह्यात चिखलदरा नगर पालिकेत सर्वाधिक ८५.२३ टक्के मतदारांनी मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पडले. तर वरुड नपमध्ये सर्वात कमी ६४.०७ टक्के मतदान झाले. उल्लेखनीय म्हणजे या निवडणुकीत भाजप, कॉंग्रेस यांच्यात जोरदार लढाई बघायला मिळाली. तर दोन्ही राष्ट्रवादी, दोन्ही शिवसेनेचे उमेदवारांनी या निवडणूक रणांगणात चांगलीच चुरस निर्माण केली होती. निकाल आता तब्बल १७ दिवसांनी म्हणजे २१ डिसेंबरला लागणार आहे. त्यामुळे कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. मतदानाच्या टक्केवारीबाबतही उत्सुकता आहे. दुपारी ३.३० वा. पर्यंत वरूडमध्ये ४८.४७ टक्के, दर्यापूरमध्ये ४९.९१ टक्के, मोर्शीत ५०.३०टक्के, चिखलदरा ७३.७९ टक्के, शेंदूरजनाघाट ५७.७६ टक्के, चांदूर रेल्वे ४६.४४ टक्के, चांदूर बाजार ४५.४१ टक्के, धामणगावरेल्वे ५१,५९ टक्के, धारणी ४६.६७ टक्के आणि नांदगाव खंडेश्वरमध्ये ५५.२६ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर सायंकाळी मतदानाची टक्केवारीत वाढ झाली. मंगळवारला दिवस अखेर वरूडमध्ये ६४.०७ टक्के, दर्यापूरमध्ये ६८.६६ टक्के, मोर्शीत ६५.७८ टक्के, चिखलदरा ८५.२३ टक्के, शेंदूरजनाघाट ७३.५३ टक्के, चांदूर रेल्वे ६८.४९ टक्के, चांदूर बाजार६७.१३ टक्के, धामणगाव रेल्वे ६७.२१ टक्के, धारणी ६४.४३ टक्के आणि नांदगाव खंडेश्वरमध्ये ७३.३० टक्के मतदान झाले होते. त्यानंतर सायंकाळी मतदानाची टक्केवारीत वाढ झाली.

### प्रवीण पोटे पाटील म्हणतात ११ ही नगराध्यक्ष हे भाजपाचेच निवडून येणार

जिल्ह्यातील सर्व ११ नगराध्यक्ष पदांवर भाजपचा विजय निश्चित असल्याचा ठाम दावा भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी पालकमंत्री रवीण पोटे-पाटील यांनी मंगळवारी (ता. दोन) केला. अमरावती विभागातील नगरपालिका व पंचायत निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेचा आढावा घेतल्यानंतर पत्रकारांशी बोलत होते.

पोटे-पाटील म्हणाले की, जिल्हाभरात वातावरण भाजपाच्या बाजूने असून सर्व नगरपालिकांमध्ये पक्षाची भक्कम पकड दिसून येत आहे. पक्षाच्या प्रचाराची आघाडी, संघटनशक्ती आणि रणनीती यामुळे बहुसंख्य सर्व नगरपरिषदांमध्ये भाजपचेच नगरसेवक निवडून येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.आजच्या मतदानाचा कल स्पष्टपणे भाजपाच्या बाजूने झुकलेला आहे. त्यामुळे सर्व ११ नगराध्यक्ष भाजपचेच निवडून येतील, असा ठाम दावा त्यांनी केला. विशेष म्हणजे, यापूर्वीही पोटे-पाटील यांनी केलेले निवडणूक अंदाज अनेक वेळा खरे ठरल्याची नोंद आहे.

### धामणगाव रेल्वेत ६७. २ टक्के मतदान

धामणगावरेल्वेः धामणगाव रेल्वे नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूकशांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सकाळी मतदानास मंद गतीने सुरुवात झाली असली तरी दुपारनंतर मतदारांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केंद्रांवर गर्दी केली. शहरातील २१ मतदान केंद्रांवर दिवसभर मतदान सुरळीतरित्या पार पडले.शहरातील एकूण मतदार संख्या १८,१२४ असून यामध्ये ८, ७९७ पुरुष, ९,३२६ महिला आणि १ इतर मतदाराचा समावेश आहे. आज झालेल्या निवडणुकीत एकूण १२,१८२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, त्यापैकी ६, २१७ पुरुष तर ५,९६५ महिलांनी मतदान केले. प्राथमिक आकडेवारीनुसार एकूण ६७.२ टक्के मतदान झाले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी झालेल्या या निवडणुकीत मतदारांचा उत्स्फूर्त सहभाग जाणवला. पोलिस व निवडणूक यंत्रणेकडून व्यापक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दिवसभर कोणतीही अप्रीय घटना घडली नाही. शहरवासीयांचे लक्ष नव्या नगराध्यक्ष आणि २० नगरसेवकांच्या निवडीकडे लागले आहे.

### चिखलदरा नप. ८५.२३ टक्के मतदान

चिखलदरा नगरपालिकेत ३३०० मतदार असून सायंकाळपर्यंत सुमारे ८५ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदारांनी चिखलदरा नगरपालिकेत प्रचंड प्रतिसाद दाखवला. दुपारपर्यंत मोठ्या प्रमाणात या ठिकाणी मतदान झाले होते. नवीन युवकांनी सुद्धा मतदानाचा हक्क बजावला, चिखलदरा नगरपालिकाही क दर्जाचे नगरपालिका असून महाराष्ट्रातील सर्वात कमी मतदार असणारी नगरपालिका आहे.

**वरुड मध्ये ६४.७टक्के मतदान –** वरुड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष व २५ नगरसेवकांकरीता शहरातील एकूण ४५ मतदान केंद्रावर नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. यावेळी निवडणूक रिंगणात असलेल्या नगराध्यक्ष पदाकरीता ०९ आणि नगरसेवक पदाकरीता ११५ उमेदवारांचे भवितव्य इलेक्ट्रॉनिक्स वोटींग मशीनमध्ये बंद झाले असून एका मतदान केंद्रावर रात्री ८ वाजेपर्यंत मतदान प्रक्रीया सुरु होती. यावेळी शहरातील एकूण ६४.७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक बजावल्याची माहिती निवडणुक अधिकारी प्रदिप पवार यांनी दिली.

**चांदूर रेल्वेत ६८.४९ टक्के मतदान–** चांदूर रेल्वे नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले. सकाळी ७.३० वाजता पासुन नगर परिषद निवडणुकीच्या मतदानाला सुरूवातझाली. चांदूर रेल्वे शहरातील एकुण १० प्रभागातील एकुण २२ मतदान केंद्रावर ५९६३ स्त्री व ६४५२ पुरूष मतदार असे एकुण १२४१५ मतदारांनी मतदान केले असुन ६८.४९ टक्के मतदान झाले आहे.

---

संताजी नगरातील पिंकी हत्याकांडाचे रहस्य उलगडले

## ४८ तासात दुसरा पती 'सनी' ला बेड्या




**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

मंगळवारी, राजापेठ येथील संताजी नगर येथील रहिवासी निलिमा उर्फ पिकी संजय खरबडे हिच्या हत्येप्रकरणी, गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अखेर तिचा पती सनी उर्फ नितीन सुरेश इंगोले (३५, अशोक कॉलनी, अर्जुन नगर) याला अटक केली, जो भूजल संवर्धन विभागाच्या पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागात काम करतो. चौकशीदरम्यान आरोपी सनीने सांगितले की, प्रेमसंबंधानंतर पिंकीने दबाव आणि ब्लॅकमेल करून त्याला लग्न करण्यास भाग पाडले.त्यानंतर तिने तिच्यासोबत घरी जाण्याचा आग्रह धरला, ज्यामुळे दोघांमध्ये अनेक भांडणे झाली. शनिवारी, २९ नोव्हेंबर रोजी दोघांनी एकत्र दारू प्यायली. त्या रात्री नंतर, झोपेत असताना सनीने तिच्या डोक्यावर खलबत्त्याने वार केले आणि नंतर तिच्या गळ्यावर चाकूने वार केल्याची कबुली दिली.

### मित्राला फोन केल्यानंतर संशय निर्माण

पिकी हत्येप्रकरणी, सुरुवातीपासूनच पोलिसांना नितीन इंगोले म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सनीवर संशय होता. सुरुवातीला त्याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली, परंतु त्याने कोणताही संबंध नसल्याचे मोठ्या शिताफीने स्पष्ट केले. राजापेठ पोलिसांनी, गुन्हे शाखेसह या प्रकरणाचा विविध अँगलने तपास केला, परंतु ठोस पुरावे समोर न आल्यामुळे हे प्रकरण अधिकच आव्हानात्मक बनले. दरम्यान, जेव्हा तपासात असे उघड झाले की सनीने रविवारी एका मित्राला फोन करून हार्ड डिस्कमधून डिलीट केलेला डेटा बॅक अपद्वारे पुनर्संचयित करता येईल का असेअसे विचारले होते, तेव्हा त्याचा मित्र उत्सुक झाला आणि सनीचा सहभाग असल्याचा संशयबळावला. त्यानंतर, पोलिसांनीसनीच्या भावाची चौकशी केली आणि शनिवारी पहाटे ४:३० च्या सुमारास सनी घरी परतल्याचे कळले, त्यानंतर सनीने हत्येची कबुली दिली.

## मनरेगात मनासारखं झालं; वैयक्तिक कामांची मर्यादा दोनवरून झाली सात लाख !

### लाखो शेतकऱ्यांना मिळणार दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती :** केंद्र सरकारने मनरेगा योजनेतून होत असलेल्या वैयक्तिक मालमतेवरील कामांसाठीची आर्थिक मर्यादा वाढवण्याचा निर्णायक निर्णय घेतला आहे. आतापर्यंत विहिरी, शेततळे, जमीन विकास आदी कामांसाठी दोन लाख रुपये मर्यादा होती. मात्र, आता ती थेट सात लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांचे प्रलंबित कामांवरील गंडांतर दूर झाले असून, अनेक महिन्यांपासून कामे थांबलेले लाभार्थी मोठा श्वास घेऊ शकतील.

राज्यात सध्या मनरेगांतर्गत १०.८९ लाख वैयक्तिक कामांची प्रक्रिया सुरू आहे. आर्थिक मर्यादा अपुरी असल्याने ही कामे चालू ठेवण्यात मोठ्या अडचणी येत होत्या. अनेक जिल्ह्यांत विहिरी, शेततळे, बंधारे, जमीन समतलीकरण आदी कामांना अर्धवट स्थितीत थांबावे लागले होते. केंद्राच्या नव्या निर्णयानंतर ही सर्व कामे गतिमान होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. मनरेगाचे सॉफ्टवेअरही नव्या मंजुरीसाठी तांत्रिकदृष्ट्या अपडेट करण्यात आले आहे. वैयक्तिक लाभार्थी या बदलामुळे ६८ प्रकारच्या शेतकरी लाभांच्या कामांना नव्याने भर पडणार आहे. आधी ५ वरून २ लाख केली होती मर्यादा(बोल्ड करणे)मनरेगा योजनेंतर्गत वैयक्तिक कामांसाठी आर्थिक मर्यादा मागील काळात ५ लाखांवरून २ लाख केली होती. ही कपात मुख्यतः राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या कामांचा मंजुरीसाठी आली होती. मर्यादा कमी झाल्यामुळे अनेक कामे प्रलंबित राहू लागली.

जिल्ह्यात ५ हजार ५५० कामे सुरू(बोल्ड करणे)चंद्रपूर जिल्ह्यात ग्रामपंचायत, पीडब्ल्यूडी विभाग, वन विभाग, बांधकाम विभाग, समाजिक वनीकरण, कृषी विभाग, असे मिळून जवळपास पाच हजार ५०० कामे सुरू आहेत.

**मनरेगा सॉफ्टवेअरमध्ये आता केली सुधारणा**

मनरेगा योजनेंतर्गत अधिक मजुरी, प्रस्ताव नोंदणी आणि कामांच्या प्रगतीची नोंदणी यामध्ये सातत्याने अडथळे येत असल्याच्या तक्रारींवर उपाय म्हणून केंद्र सरकारने आता मनरेगा सॉफ्टवेअरमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या आहेत.

## शिरजगाव बंड हादरले! ६ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार

### आरोपी राजू मुल्ला ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताकदि.३चांदुर बाजार –** चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव बंड येथे उर्दू नगरपरिषद शाळेत ६ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचाराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी राजू मुल्ला झहरुद्दीन मुल्ला (वय ५६) या आरोपीला पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे.

ही घटना मंगळवारी दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास घडल्याची माहिती आहे. घडलेल्या प्रकारानंतर पीडित चिमुरडीने घरी जाऊन संपूर्ण माहिती आई-वडिलांना दिली. कुटुंबीयांनी तत्काळ शाळेत जाऊन उउढत फुटेज तपासले असता संशयित आरोपीची हालचाल स्पष्टपणे दिसून आली.यानंतर कुटुंबीयांनी विलंब न लावता चांदूर बाजार पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी जलदगतीने कारवाई करत आरोपीला अटक केली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## 'व्हीएसके' आता विद्यार्थ्यांचीच नव्हे, तर गुरुजींचीही हजेरी घेणार

### अंमलबजावणी कधी होणार आता कठोर पाऊल उचलण्याचे संकेत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

शाळांमध्ये आता विद्यार्थी आणि शिक्षकांची हजेरी विद्या समीक्षा केंद्र (व्हीएसके) प्रणालीवर नोंदवावी लागणार आहे. शासनाच्या निर्णयामुळे पारंपरिक हजेरीपत्रकाची गरज भासणार नाही. सर्वांची उपस्थिती ऑनलाइन नोंदवली जाणार आहे. शासनाच्या धोरणामुळे प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने शाळांना विस्तृत मार्गदर्शक सूचना पाठविल्याची माहिती आहे.

डिजिटल हजेरीमुळे शाळांच्या व्यवस्थापनात सुधारणा अपेक्षित आहेत. परंतु, कामाच्या अतिरिक्त ताणामुळे शिक्षक संघटनांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सर्वात आधी विद्यार्थ्यांसाठी व्हीएसके हजेरीची अंमलबजावणी सुरू झाली. यावरही शिक्षकांनी नाराजीचा सूर आळवत सुरुवातीला थंड प्रतिसाद दिला. मात्र, शिक्षण विभागाने वारंवार पाठपुरवा सुरूच ठेवल्याने बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थ्यांची व्हीएसके प्रणालीवर हजेरी नोंदविली जाते. शिक्षकांनाही व्हीएसके या प्रणालीची अंमलबजावणी बंधनकारक करण्यात आली आहे. मात्र, या डिजिटल शिक्षण मोहिमेला गती मिळत नसल्याचे प्रशासनाच्या निर्दर्शनास आले आहे. त्यामुळे आता कठोर पाऊल उचलण्याचे संकेत दिले जात आहे.आधीच शिक्षकांवर विविध शालेय उपक्रम, परीक्षा, अहवाल आणि इतरही कामाचा ताण आहे.

अशैक्षणिक कामांमुळे अध्यापनावर परिणाम होत आहे. आता व्हीएसके प्रणालीची अंमलबजावणी झाल्यास शिक्षकांचे आणखी काम वाढणार आहे.

**नेटवर्कचाही आहे खोडा**

ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा नसल्याने अडचणी येत असल्याचे सांगितले जाते. ऑनलाइन काम करताना शिक्षकांना तारेवरची कसरत करावी लागते. शालेय पोषण आहाराची माहिती अनेकदा शाळेच्या बाहेरच भरावी लागते.

**जाणून घ्या काय आहे व्हीएसके प्रणाली?–** व्हीएसके हा शिक्षण क्षेत्रातील क्रांतिकारी उपक्रम आहे. जो राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चा भाग म्हणून सादर करण्यात आला आहे. व्हीएसके आधुनिक शैक्षणिक कमांड म्हणून काम करते. शैक्षणिक व्यवस्थेच्या कार्यप्रणालीबद्दल त्वरित, डेटाआधारी अंतदृष्टी प्रदान करण्याची क्षमता आहे. विद्यार्थी, शिक्षकांची आकडेवारी एकत्र करून शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेते.

## महाराष्ट्रातील राजभवनचे नाव बदलले

# राज्यपालांचे निवासस्थान आता ‘लोकभवन’


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ मुंबई**

केंद्र सरकारच्या पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलल्यानंतर आता महाराष्ट्रातील राजभवनचे नावही बदलण्यात आलं आहे. राज्याचे राजभवन आता लोकभवन या नवीन नावाने ओळखलं जाणार आहे. राज्य सरकारने या बाबत अधिसूचना जारी केली असून त्याची तात्काळ अंमलबजावणी केली जाणार आहे.

राजभवनच्या सचिवांच्या नावाने एक अधिसूचना जारी करण्यात आली असून त्यामध्ये राजभवनचे नाव लोकभवन असे करण्यात आल्याचा आदेश आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल या ठिकाणी वास्तव्य करतात.

केंद्र सरकारने पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलून सेवा तीर्थ असे ठेवले आहे. लवकरच नवीन कॉम्प्लेक्समध्ये स्थलांतरित होणार असून त्या इमारतीलाच सेवा तीर्थ हे नाव देण्यात आले आहे. नव्या परिसराला आधी सेंट्रल व्हिस्टा रीडेव्हलपमेंट प्रोजेक्टअंतर्गत म्हणून ओळखले जात होते.

**नवीन कॉम्प्लेक्समध्ये**




**अनेक महत्त्वाची कार्यालये**

एग्जिक्युटिव्ह एन्क्लेव्हमध्ये झचज व्यतिरिक्त कॅबिनेट सचिवालय, नॅशनल सिक्युरिटी कौन्सिल सचिवालय आणि इंडिया हाऊसची कार्यालये असतील. इंडिया हाऊस ही परदेशी उच्चस्तरीय प्रतिनिधींशी चर्चेसाठी तयार करण्यात आलेली विशेष जागा असेल. सेवा तीर्थ हे वर्कप्लेस सेवा, राष्ट्रीय ध्येय आणि जबाबदारीचे प्रतीक म्हणून डिझाइन करण्यात आले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर शासकीय इमारतींची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हे फक्त नामांतर नसून सार्वजनिक पदांची भावना पुनर्परिभाषित करण्याचा मोठा उपक्रम आहे.

**२०१६ पासून सुरू झालेली बदलांची मोहीम–** या बदलांची सुरुवात २०१६ मध्ये झाली, जेव्हा पंतप्रधान मोदी यांनी आपल्या निवासस्थानाचे नाव ‘७ रेस कोर्स रोड’ वरून बदलून ७ लोक कल्याण मार्ग असे ठेवले. त्यानंतर २०२२ मध्ये राजपथचे नाव बदलून ‘कर्तव्य पथ’ करण्यात आले.आता भारताच्या प्रशासनिक केंद्रातही मोठा बदल झाला असून सेंट्रल सेक्रेटेरिएटच्या जागी ‘कर्तव्य भवन’ अस्तित्वात आले आहे.सरकारच्या म्हणण्यानुसार हे बदल प्रतिमा नव्हे, तर शासनाच्या विचारसरणीत होणाऱ्या परिवर्तनाचे प्रतीक आहेत. म्हणजेच सत्ता आणि नियंत्रणाच्या जुन्या चिन्हांऐवजी सेवा, कर्तव्य आणि जवाबदारी यांना केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न आहे असं सांगण्यात आलं आहे.

# दहावी, बारावीचे प्रमाणपत्र आता ऑनलाइन मिळणार !

## एकसमान ५०० रुपये शुल्क, पोस्टाद्वारे किंवा पीडीएफ प्रत मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–**

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्कशीटची दुय्यम प्रत, मूळ प्रमाणपत्र, तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र किंवा त्यात दुरुस्तीसाठी विभागीय मंडळाच्या कार्यालयात हेलपाटे मारावे लागत होते. आता हे कायमाचे थांबणार असून शिक्षण मंडळाने ही महत्त्वाची कागदपत्रे आता ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ५०० रुपयांचे शुल्क आकारले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यापूर्वी प्रमाणपत्र हरविले किंवा त्यात दुरुस्ती करायची झाल्यास विद्यार्थ्यांना अनेक दिवस विभागीय कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत होत्या. त्यामुळे वेळ, पैशासोबत मानसिक त्रासाचा सामना विद्यार्थ्यासह पालकांना करावा लागत होता. आता विद्यार्थी ऑनलाईन अर्ज करून



घरबसल्या हे सर्व कागदपत्रे मिळवू शकतो. या निर्णयामुळे सही-शिक्क्यासाठी होणारी धावपळ थांबेल आणि लाखो विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा व मानसिक त्रास वाचणार असल्याने मोठा फायदा होणार आहे.राज्य मंडळाच्या अधिकृत पोर्टलवर लॉगिन करून आधार क्रमांक टाकून ओटीपी पडताळणी, वर्ष, परीक्षेचा प्रकार (एसएससी/एचएससी) आणि प्रमाणपत्राचा प्रकार निवडणे. शुल्क भरून अर्ज सबमिट केल्यावर पीडीएफ प्रत तत्काळ मिळेल, तर मुद्रित प्रत काही दिवसांनी पोस्टाने घरपोच मिळणार आहे.

**शिफारसपत्राची गरज नाही–** आता या कागदपत्राची मागणी करताना शाळेकडून शिफारसपत्र, मुख्याध्यापकांची सही किंवा मंडळ अधिकाऱ्यांचे शिक्के लावण्याची आवश्यकता नाही. संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पडताळणीवर आधारित आहे.

**सन १९९० पासूनचा डेटा–** राज्य मंडळाने सन १९९० नंतरच्या सर्व दहावी-बारावीच्या नोंदी डिजिटल केल्या आहेत. त्यामुळे १९९० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आता ऑनलाइनद्वारे प्रमाणपत्र मिळविणे सुलभ झाले आहे.–

# शेअर मार्केट फ्रॉड, आरोपी कोल्हापुरातून जेरबंद

## शहरातील एका व्यावसायिकाला ७० लाखांचा चूना

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३चांदुर बाजार** शहरातील एका व्यावसायिकाला शेअर बाजारातील ट्रेडिंगद्वारे चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ७०.०६ लाख रुपयांची फसवणूक केली.या प्रकरणी कोल्हापुरातून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपीचे नाव कुलदीप अशोक सावरतकर (४०) आहे. सायबर पोलिसांनी ही कारवाई केली. ६ ऑगस्ट रोजी आरोपीने तक्रारदाराला शेअर बाजारात गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवूनएका व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये सामील केले. त्यानंतर क्यूआयबी, ब्लॉक ट्रेडिंग, आयपीओ आणि ओटीसी ट्रेडिंगद्वारे चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ऑनलाइन ७० लाख ६ हजार ४७रुपयांचा ऑनलाईन फसवणूक केली. या प्रकरणी तक्रारीच्या आधारे सायबर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.



या रकमेपैकी ५ लाख रुपये आरोपी कुलदीप अशोक सावरतकर (४०) याच्या आयसीआयसीआय बँकेच्या खात्यात जमा झाले. तपासात असे आढळले की, आरोपीने विविध खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर केले होते. तथापि, हे पैसे ट्रेडमार्कने चिन्हांकित होते. आरोपींबद्दल माहिती मिळताच, सायबर पोलिस स्टेशनमधील सहाय्यक निरीक्षक अनिकेत कासार, हेड कॉन्स्टेबल विशाल यादव, कॉन्स्टेबल अश्विन यादव आणि अनिकेत वानखडे यांचे पथक कोल्हापूरला रवाना झाले.आणि तेथे आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीला न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली असून तो आता न्यायालयीन कोठडीत आहे. या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर आरोपींचा शोध सुरू झाला आहे.या प्रकरणात ११ लाख ७हजार रुपये होल्ड करण्यात आले आहे. यापैकी १.९० लाख रुपये परत करण्यात आले आहेत. उर्वरित रकमेबाबत न्यायालयीन आदेशमिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलिस आयुक्त अरविद चावरिया, उपायुक्त शाम घुगे, गणेश शिदे, रमेश धुमल, सहाय्यक आयुक्त शिवाजी राव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक महेंद्र अंभोरे, निरीक्षक प्रियंका कोटावार, अनिकेत कासार, हेड कॉन्स्टेबल उल्हास ट्टालारे, निखिल माहुरे, विशाल यादव, जवान अश्विन यादव, अनिकेत वानखडे आणि सुषमा आठवले यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# डॉ.अरविंद देशमुख यांचा ‘सेवामहर्षी’ पुरस्काराने गौरव

## पद्मविभूषण डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते मानाचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३ नांदगाव पेठ**

सामाजिक, धार्मिक, मानवसेवा तसेच ग्रामीण भागातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या श्रीरामचंद्र संस्थान नांदगाव पेठचे अध्यक्ष आणि माजी प्राचार्य अरविंद देशमुख यांची समाजसेवा आजमितीस अनुकरणीय ठरली आहे. त्यांच्या या बहुमूल्य कार्याची दखल घेत यंदाचा मानाचा ‘सेवामहर्षी’ पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार महान शास्त्रज्ञ, सुपर कॉम्प्युटरचे जनक, पद्मविभूषण डॉ. विजय भटकर यांच्या शुभहस्ते देण्यात आला. डॉ. भटकर यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या हस्ते झालेला हा गौरव त्यामुळे अधिकच ऐतिहासिक ठरला.

दर्यापूर येथील गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ समाजसेवक प्रा. गजाननराव भारसाकळे, शंकरराव शिक्षण संस्था करजगावचे पदाधिकारी तसेच विविध



क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत हा भव्य आणि दिमाखदार सोहळा पार पडला. समाजकार्यातील सातत्य, निस्वार्थ वृत्ती आणि लोकाभिमुख दृष्टिकोन या गुणांचा उच्च सन्मान म्हणून देशमुख यांना हा पुरस्कार दिला गेला.पुरस्कार स्वीकारतांना आपल्या मनोगतामध्ये प्राचार्य अरविंद देशमुख म्हणाले,की,हा सन्मान माझा एकट्याचा नाही. समाजहितासाठी माझ्या सोबत खंबीरपणे उभे राहिलेले हितचिंतक, मित्रपरिवार, ग्रामवासी, संस्था आणि समाजप्रेमी बांधव - या सर्वांचाच या गौरवात मोलाचा वाटा आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले. या वेळी मान्यवरांनीही देशमुख यांच्या दीर्घकाळाच्या सामाजिक योगदानाचे मनापासून कौतुक केले. त्यांच्या कार्यातील सातत्य, समाजसेवेची निस्वार्थ भावना आणि समस्यांकडे पाहण्याची व्यापक दृष्टी आजच्या काळात समाजासाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाला उपस्थित नागरिकांनीही देशमुख यांच्या यापूर्वी केलेल्या विविध उपक्रमांची उजळणी करत भविष्यात आणखी व्यापक स्तरावर त्यांनी समाजकार्यात योगदान देण्याबाबत शुभेच्छा व्यक्त केल्या.

**४ थे राज्यस्तरीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन आयोजन समिती**

# अध्यक्षपदी दिनकर महाराज चोरे व सचिवपदी वैभव रौराळे यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३अमरावती**

अमरावती येथे राष्ट्रधर्म युवा मंच, अमरावती जिल्ह्याच्या वतीने चवथे राज्यस्तरीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन दिनांक ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी अभियंता भवन, शेगाव नाका, अमरावती येथे पार पडणार आहे. अ.भा. श्रीगुरूदेव सेवा मंडळाच्या तत्वप्रणालीवर आधारित हे संमेलन जेष्ठ आजीवन प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून दोन दिवस विविध कार्यक्रमांची मेजवानी अमरावतीकरांना अनुभवायला मिळणार आहे.संमेलनाच्या आयोजन समिती अध्यक्षपदी दिनकर महाराज चोरे व सचिवपदी वैभव रौराळे यांची निवड करण्यात आली असूनयशस्वी आयोजनाची धुरा यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. या साहित्य





संमेलनात मान्यवर व्याख्यानमाला, कीर्तन, प्रकट मुलाखत, कवी संमेलन, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, सामुदायिक ध्यान व प्रार्थना असे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा व्यापक प्रसार हा या संमेलनाचा मूलभूत उद्देश असून त्यांचे विचार गावागावांत पोहोचविणाऱ्या गुरुदेव सेवकाला ‘ग्रामगीता जीवनगौरव पुरस्कार’ प्रदान करण्याची परंपरा यावर्षीही चालू राहणार आहे. तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तींना गौरविण्यात येणार आहे. संमेलनाची तयारी सुरळीत व्हावी म्हणून उत्तमसरा येथे झालेल्या बैठकीत आयोजन समितीचे गठन करण्यात आले.

या समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते दिनकर महाराज चोरे यांची निवड करण्यात आली असून सचिवपदी वैभव रौराळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीमध्ये मयुर वानखेडे, शाम सनके, अर्जुनदास सनके, सौरभ मानकर, संजय लेव्हरकर यांचा समावेश करण्यात आला आहे.याशिवाय संमेलनाचे मार्गदर्शक म्हणून आचार्य वेरुळकर, नामदेव महाराज गव्हाळे, डॉ. नरेंद्र तराळ, रामेश्वर बरगट, इंजि. अरविंद काळमेघ, ज्ञानेश्वर दादा निस्ताने, अजयसिंग चौव्हान व बापूराव धोटे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण संमेलनाची रूपरेषा राबविण्यात येणार आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठी लवकरच विविध समित्या स्थापन केल्या जाणार आहेत. त्यात वर्गणी व्यवस्था समिती, भोजन समिती, विचारपीठ व्यवस्थापन, स्वच्छता, सामूहिक ध्यान-प्रार्थना, पाणी वितरण आणि बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांची निवासी व्यवस्था समिती यांचा समावेश असेल. अमरावती जिल्ह्यातील श्रीगुरूदेव सेवा मंडळातील सक्रिय सेवकांना या समित्यांत काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.या निमित्ताने सर्व सेवकांनी स्वयंप्रेरणेने आपली नावे आयोजन समितीकडे नोंदवावीत, असे आवाहन केंद्रिय सहसचिव अंकुश मानकर, जिल्हाध्यक्ष कृष्ण बैलमारे आणि युवराज अढाऊ यांनी केले आहे.

# अमरावती रेल्वे स्थानक हलविण्याला विरोध

## भाजपाचा भूमाफियांसाठी डाव - काँग्रेसने स्पष्ट केली भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** येथील मॉडेल रेल्वे स्थानक आहे त्या जागेवरून राजापेठ पोलिस ठाण्याच्या मागे हलविण्याच्या प्रस्तावाला काँग्रेसचा तीव्र विरोध आहे. विद्यमान रेल्वे स्थानकाची जागा भूमाफियांच्या घशात टाकण्याचा हा डाव असल्याचा आरोप काँग्रेसने आज पत्रकार परिषदेतून केला.शहराचे वैभव असलेले ब्रिटिशकालीन रेल्वे स्थानक बंद पाडण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी सुरू केलेले कट कारस्थान निंदनीय आहे. रेल्वे स्थानक हटवून त्या जागेवर आधुनिक मॉल व इतर सोयी उभारण्याच्या नावाखाली भूमाफियांना हस्तांतरित करण्याचे षड्यंत्र भाजपा व महायुतीच्या लोकप्रतिनिधींनी रचले आहे. या षड्यंत्राचा भाग म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी या प्रस्तावाला उघडपणे मान्यता दिली आहे. कोणत्याही परिस्थितीत अमरावती रेल्वे स्थानकाला



काँग्रेस हात लावू देणार नाही, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. शहराच्या विकासाची रेल्वे स्थानकाच्या आगमनाने झाली. शहराच्या परकोटाच्या बाहेर खर्या अर्थाने विकासाचे नवे पर्व तेव्हापासून सुरू झाले होते व शहर अत्यंत गतीने भरभराटीकडे गेले होते. रेल्वे स्थानक असणे हे कोणत्याही शहरासाठी समृद्धी आणि संपन्नता आणणारी महत्त्वपूर्ण बाब असते. अनेक प्रयत्न आणि संघर्षानंतर मिळालेले हे स्थानक उध्वस्त करून त्या जागेला भूमाफिया च्या घशात घालण्याचा जो लपून-छपून प्रयत्न गेल्या चार महिन्यांपासून महायुतीच्या नेत्यांनी सुरू केला होता त्याचा भांडाफोड आता झाला आहे. या कटाचा मुख्य भाग म्हणजे रेल्वे पुलाचे खासगी स्ट्रक्चरल ऑडिट करणे, तो पुल वाहतुकीसाठी अचानक बंद करणे आणि त्याची दुरुस्ती करण्यासाठी कोणतीही हालचाल न करणे ही बाब आता उघड झाली आहे. या सार्या हालचालींचा अंतिम उद्देश रेल्वे स्थानक बंद पाडणे हाच आहे, असा आरोप करून काँग्रेसने हे षडयंत्र हाणून पाडण्याचा निर्धार केल्याचे पदाधिकार्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर मिलिंद चिमोटे, समीर जवंजाळ, वैभव देशमुख यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# उद्याच्या पौर्णिमेला दिसणार ‘सूपरमून’

## पृथ्वीपासून सर्वात कमी अंतरावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** ४ डिसेंबर रोजी पौर्णिमेच्या दिवशी सुपरमून दिसणार आहे. या दिवशी पृथ्वीपासून चंद्राचे अंतर कमी राहील. त्यामुळे चंद्र या दिवशी मोठा व प्रकाशमान दिसेल. सरासरी पृथ्वी-चंद्र हे अंतर ३ लाख ८५ हजार कि.मी. असते. जेव्हा पृथ्वी-चंद्र हे अंतर ३ लाख ७० हजार कि. मी. च्या आत असते त्याला सुपरमून असे म्हणतात.

चंद्र पृथ्वीच्या जवळ आल्याने समुद्राच्या भरती-ओहोटीची तीव्रता वाढणे, वादळ यासारख्या घटना घडू शकतात. पृथ्वीवरून आपणास नेहमी चंद्राचा ५९ टक्क भाग पाहता येतो. चंद्रावरून पृथ्वी ही ९८.४% दिसू शकते. चंद्रावरून पृथ्वीवर प्रकाशकिरण येण्यास १.३ सेकंद लागतात. चंद्राचे वय हे ४.६५ अब्ज वर्ष आहे. चंद्र हा



पृथ्वीपासून दरवर्षाला ३.८ सेंटीमीटर लांब जात आहे. त्यामुळे पृथ्वीचा फिरण्याचा वेग कमी होईल व १०० वर्षांनी दिवस हा २ मिली सेकंदने मोठा होईल. चंद्रावर ३० हजार विवरे व १२ पर्वत आहेत. पर्वत व विवरे दुर्बिणीमधून अगदी चांगल्या प्रकारे पाहता येतात. ४ डिसेंबरला संध्याकाळी दिसणारा सूपरमून खगोलप्रेमींनी व जिज्ञासूंनी अवश्य बघावा. हा सूपरमून अगदी साध्या डोळ्यांनी पाहता येईल, अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी दिली आहे.

# गडचांदुरात मतदाराने फोडले ईव्हीएम यंत्र!

## नगाराची बटन दाबली, तर कमळाचे लाईट लागण्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३चंद्रपूर –** चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदूर नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी मंगळवार, २ डिसेंबर रोजी सुरू असलेल्या मतदान प्रक्रियेदरम्यान प्रभाग ९ मधील आदर्श हिंदी विद्यालय (केंद्र क्रमांक २) येथे मोठा गोंधळ उडाला. राम मल्लेश दुर्गे (४०) या मतदाराने मतदान प्रक्रियेदरम्यान ‘नगारा’चे बटन दाबल्यानंतर अचानक भाजपच्या ‘कमळ’ चिन्हाचा दिवा लागल्याचा आरोप करीत संतापाच्या भरात ईव्हीएम यंत्रच जमिनीवर आदळत फोडून टाकले! सायंकाळी ५ वाजून २० मिनिटांवर झालेल्या या धक्कादायक घटनेची माहिती पसरताच मतदान



केंद्राबाहेर मतदारांनी एकच गर्दी केली होती. संतप्त नागरिकांनी मुर्दाबादचे जोरदार नारे द्यायला सुरूवात केली. त्यामुळे काही वेळासाठी तणाव निर्माण होऊन मतदान प्रक्रिया खोळंबली. उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र जाधव, मुख्याधिकारी आशिष चव्हाण आणि ठाणेदार शिवाजी कदम यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी नागरिकांना शांत करण्यासाठी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी ईव्हीएमची पंचनामा प्रक्रिया सुरू केली असून, पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे गडचांदुरातील प्रभाग ९ च्या मतदान केंद्राबाहेर सायंकाळी साडेसातपर्यंत तणावाचे वातावरण असून, सुरक्षा वाढविण्यात आली आहे.

# ५ डिसेंबरला अमरावतीतील शाळा बंद; शिक्षक-शिक्षकेत्तर संघटनांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**




शिक्षक-शिक्षकेत्तर संघटना समन्वय समिती अमरावतीतर्फे ५ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठे आंदोलन आयोजित केले आहे. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील सर्व शाळा शुक्रवारी बंद ठेवण्याचे आवाहन विविध शिक्षक संघटनांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, प्राथमिक शिक्षक संघ, जुनी पेन्शन संघटना, शिक्षक परिषद, संयुक्त मुख्याध्यापक महामंडळ, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना आदी प्रमुख संघटना या आंदोलनात सहभागी होत आहेत. तसेच शिक्षक सेना, शिक्षक भारती, उर्दू शिक्षक संघटना, अपंग शिक्षक संघटना आदी अनेक संघटनांनीही समर्थन जाहीर केले आहे.शिक्षक संघटनांच्या महत्त्वाच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत हे आंदोलन राज्यभर होत आहे. प्राथमिक शिक्षकांसाठी TET अनिवार्यतेत सुधारणा करणे, ठढए कायदा कलम २३ नुसार बदल करण्यासाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठविणे, थांबविलेल्या पदोन्नती प्रक्रिया तातडीने सुरू करणे, म. ना. से. नियम १९८२-८४ अंतर्गत जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करणे, कमी पटसंख्येच्या नावाखाली शाळा बंद अथवा समायोजित करण्याचे धोरण रद्द करणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.याशिवाय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदभरती सुरू करणे, शिक्षणावर परिणाम करणारी इडज व इतर ऑनलाइन/ऑफलाइन कामे कमी करणे, वस्तीशाळा शिक्षकांच्या सेवा प्रथम नियुक्तीपासून ग्राह्य धरणे, ग्रामीण शिक्षकांसाठी निवास व्यवस्था उपलब्ध करणे, तसेच नगरपालिका शिक्षकांच्या वेतनासाठी स्वतंत्र पथक स्थापन करणे या मागण्या मांडण्यात आल्या आहेत.या आंदोलनाचे आवाहन राज्याध्यक्ष विजय कोंबे, सरचिटणीस राजन कोरगावकर तसेच जिल्हा पदाधिकाऱ्यांनी केले असल्याची माहिती राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.

# मतदान केंद्रावर पोहोचले जिल्हाधिकारी

## नांदगाव नगर पंचायत निवडणूक शांततेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३नांदगाव खंडेश्वर,**



नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत निवडणुकीचे मंगळवारी शांततेत मतदान पार पडले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी येथील मतदान केंद्रांवर पोहचून मतदान प्रक्रियेच पाहणी केली.

तब्बल पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या प्रचार मोहिमांमुळे शहरातील राजकीय वातावरण पूर्णतः तापले होते. उमेदवारांकडून घरोघरी भेटी, सभा, पदयात्रा, कोपरा सभा, प्रचारफेऱ्या आदी माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात होता. अखेर प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडताच सर्व उमेदवार, कार्यकर्ते तसेच प्रशासनाने सुटकेचा श्वास घेतला. या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवारांनी आपले नशीब आजमावले असून नगरसेवक पदासाठी तब्बल ७३ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते. शहरातील एकूण १२ हजार ३९ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. काही केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांची रांग पाहायला मिळत होती, तर दुपारनंतर वयोवृद्ध मतदार, महिला आणि तरुण मतदारांचा सहभाग विशेषत्वाने दिसून आला. संपूर्ण शहरात मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. प्रशासनाने सर्व मतदान केंद्रांवर नागरिकांसाठी पाणी, सावली, बसण्याची व्यवस्था आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. याशिवाय दिव्यांग आणि वृद्ध मतदारांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.

**पोलीस प्रशासनाकडून चोख**

बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संवेदनशील भागांमध्ये अधिक पोसि बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.शहरात शांतता राखण्यासाठी गस्त वाढवण्यात आली होती. दरम्यान, मतदान प्रक्रियेची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नांदगाव खंडेश्वर येथील विविध मतदान केंद्रांना भेट दिली. तसेच मतमोजणी ज्या ठिकाणी होणार आहे, त्या जागेचीही पाहणी केली. यावेळी अन्य वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक केंद्रावर जाऊन मतदारांची उपस्थिती, अधिकारी-कर्मचाऱ्यांची तयारी सुरक्षा व्यवस्था तसेच इतर सुविधा यांची पाहणी केली.त्यांनी प्रशासनाला आवश्यक ते निर्देश दिले आणि मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# परतवाड्यात पहिल्यांदाच होणार अत्याधुनिक ईईसीपी उपचार शिबिर

## हृदयविकार रुग्णांसाठी दिलासादायक उपक्रम : बायपास करण्याची इच्छा नसणाऱ्यांकरिता नवीन उपचार पद्धती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

हृदयविकार रुग्णांसाठी अत्याधुनिक, शस्त्रक्रियाविरहित आणि सुरक्षित उपचार पद्धती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ईईसीपी (Enhanced External Counter Pulsation) उपचाराबाबत जनजागृती करण्यासाठी परतवाडा येथे पहिल्यांदाच शिबिर आयोजित करण्यात आले आहे.





शिबिराचे उद्घाटन १४ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता श्री सिद्धक्षेत्र वाघामाता देवस्थान दसरा मैदान परतवाडा येथे डॉ .अभिषेक भडागे, डॉ.विमी जैन या तज्ञ डॉक्टर मंडळीच्या आणि मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. हृदयरोग तज्ञ यांच्याकडून ईईसीपी उपचाराची वैज्ञानिक कार्यपद्धती, फायदे, उपचाराचे टप्पे तसेच कोणत्या रुग्णांना या उपचाराचा सर्वाधिक फायदा होतो याबाबत सविस्तर माहिती दिली जाईल.शिबिरात छातीत दुखणे (-ngina), हृदयातील ब्लॉकेज, दमछाक, रक्तपुरवठा कमी होणे, वारंवार येणाऱ्या थकव्याची तक्रार असलेल्या रुग्णांची मोफत तपासणी, ईसीजी, बीपी तपासणी आणि सल्लामसलत करण्यात करण्यात येणार आहे.डॉक्टरांनी सांगितले की ईईसीपी ही पूर्णपणे non-invasive पद्धत असून यात कोणतीही कापाकापी किंवा शस्त्रक्रिया नसते. पायांवर लावण्यात येणाऱ्या विशेष एअर प्रेशर बेल्टद्वारे हृदयाकडे रक्तपुरवठा वाढवणे, नवीन रक्तवाहिन्या तयार होण्यास प्रोत्साहन देणे आणि शरीराची एकूण कार्यक्षमता सुधारण्यास मदत करणे हे याचे प्रमुख फायदे आहेत. या शिबिरामध्येच दंत रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांनी आपले जुने रिपोर्ट घेऊन येणे आवश्यक आहे.ज्यांची बायपास करण्याची इच्छा नाही अशा रुग्णांसाठी अतिशय उपयुक्त हे शिबिर आहे. अधिक माहितीसाठी ७९७२२२२१४७ रुग्णांनी या नंबरवर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'होम व्होटिंग' सुविधेअभावी वृद्ध, अपंग आजारी मतदारांचा अडचणींशी सामना



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

नगरपरिषदेच्या निवडणुकीलामंगळवारी सकाळी मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. सकाळच्या सौम्य थंडीत मतदान करण्यासाठी लोकांनी त्यांच्या मतदान केंद्रांवर गर्दी केली. काहींना कामावर जावे लागले, तर काहींना तातडीची कामे असल्याने त्यांनी शक्य तितक्या लवकर मतदान केले. मात्र या वेळी होम व्होटिंगची सुविधा नसल्याने आजारी, अपंग आणि वृद्ध मतदारांना अडचणीचा सामना करावा लागला. ही खंत अनेकांनी बोलूनही दाखविली.अनेक मतदान केंद्रावर वृद्धांसाठी बसण्याची व्यवस्था नव्हती, तसेच पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था नव्हती. लांब रांगांमुळे वृद्ध मतदारांना बसण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे दिसून आले. शिवाय, तहान लागली असतानाही त्यांना पाणी नाकारण्यात आले. वृद्ध मतदारांसाठी मतदान केंद्रावर रॅम्प बांधण्यात आला असला तरी तो कमी असल्याचे दिसून आले. परिणामी, अनेक वृद्धांनी हात धरून पायऱ्यांवरून चालणे पसंत केले.

**महिला आणि पुरुषांसाठी समान रांग**

अनेक मतदान केंद्रांवर पुरुष आणि महिला दोघांसाठीही एकच रांग होती. याबद्दल विचारले असता, निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की मतदान केंद्रावर फक्त एकच मशीन असल्याने एकच रांग अनिवार्य आहे. शहरातील भगीरथा भास्कर शाळा, महिला समाज शाळा, लाल बहादूर शास्त्री विद्यालय आणि इतर मतदान केंद्रांवरही अशीच परिस्थिती दिसून आली.

# भातकुली पोलिसांची धडाकेबाज कारवाई!साई योगी हॉटेलवर छापा

## देशी-विदेशी दारूचा मोठा साठा आणि TUV वाहन जप्त - तिघांवर दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३भातकुली**

भातकुली पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये मोठी कारवाई करत साई योगी हॉटेल व रेस्टॉरंटवर छापा टाकून मोठ्या प्रमाणात देशी व विदेशी दारूचा अवैध साठा जप्त केला. २ डिसेंबर रोजी भातकुली पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीनुसार, भातकुली-दर्यापूर रोडवरील साई योगी हॉटेलमध्ये अवैधरित्या दारू विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी हॉटेलची तसेच हॉटेलमालकांच्या गाड्यांची झडती घेतली.

झडतीदरम्यान हॉटेलच्या काउंटरखालून मोठ्या प्रमाणात अवैध दारूचा साठा आढळून आला. यात बॉबी संत्रा कंपनीची ९० मिलीची ५२ देशी दारूची बाटल्या, रॉयल स्ट्रॉंग कंपनीची १८० मिलीची ७ आणि ९० मिलीची १५ विदेशी दारूच्या बाटल्या, मॅकडावल नं.१ कंपनीची १८० मिलीची ३ आणि ९० मिलीची ९ विदेशी दारूच्या बाटल्या, तसेच रॉयल चॅलेंज कंपनीची १८० मिलीची २ विदेशी दारूच्या बाटल्या यांचा समावेश आहे. तसेच महिंद्रा कंपनीची ढणत ३०० ही लाल रंगाची चारचाकी (एमएच १४ EY ६३७१) ताब्यात घेण्यात आली. एकूण जप्त मालाची किंमत सुमारे ७,०९,५०० इतकी आहे.या प्रकरणी बाळासाहेब विष्णुपंत तळोकार (५७), आशिष ज्ञानेश्वर सोनटक्के (४२) आणि कालिदास उर्फ सोनू विठ्ठल रंगे (३३) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(ई), ७७(अ), ८३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, गणेश शिंदे, रमेश धुमाळ व सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पुढील तपास भातकुली पोलीस करत आहेत.

# संस्थास्तर फेरीतील प्रवेशालाही शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती लागू

## शासनाच्या निर्णयामुळे मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**



व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये संस्थास्तर फेरी प्रवेश घेणाऱ्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. केंद्रिय प्रवेश प्रक्रियेअंतर्गत खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीची योजना लागू राहणार असल्याचे शासनाने जाहीर केले आहे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या सर्व फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांतील रिक्त जागांवर संस्थास्तरावर प्रवेश दिले जातात. मात्र, हे प्रवेश अंतिम फेरीबाहेर होत असल्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ नाकारला जात होता. त्यामुळे पात्र असूनही अनेक विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्क भरून शिक्षण घ्यावे लागत होते, ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक खर्चाचा ताण वाढत होता.

शासनाच्या नव्या निर्णयामुळे आता संस्थास्तर फेरीतील तसेच शेवटच्या फेरीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती मिळणार आहे. यामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

ही योजना आरोग्य विज्ञान, उच्च व तंत्रशिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य विकास विभागांतर्गत चालणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू असेल. यामुळे या विभागांमधील मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक खर्चात मोठी बचत होणार आहे.

मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आतापर्यंत शिष्यवृत्ती नाकारली जात असल्याने शिक्षणाचा आर्थिक ताण वाढत होता. पात्र असूनही लाभ न मिळाल्याने अनेक विद्यार्थ्यांचा हिरमोड होत होता. मात्र, नवीन धोरणामुळे त्यांच्या शिक्षणाचा मार्ग सुलभ होणार असून शिक्षण चालू ठेवणे आर्थिकदृष्ट्या अधिक सोपे होणार आहे.केंद्रीभूत प्रक्रियेनंतर रिक्त असलेल्या जागांवर मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार असल्याने, हा निर्णय विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा ठरत आहे.

# वन्यप्राण्यांकडून शेतातील पिकांची नासाडी, शेतकरी हैराण; वनविभाग लक्ष देईल का?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**



जिल्ह्यात अनेक ठिकाणी वन्यप्राण्यांकडून पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी होत असल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. शेतीची वन्यजीवांपासून संरक्षण करण्याकरिता वनविभागाने ठोस बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.नीलगाय, रानडुक्कर, माकड, कोल्हा, असे विविध वन्यप्राणी आहेत. हे वन्यप्राणी लगतच्या जंगलातून शेतात शिरून पिकांचे नुकसान करीत आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी दिवस-रात्र शेतात पहारा द्यावा लागत आहे. वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे पिकाची पेरणी करूनही हातात काही येईल, याची खात्री नसल्याने जंगल परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी स्वतः जमीन कसणेच बंद केले आहे. अनेक शेतकरी शेत मक्त्याने देत आहेत. आधीच है भाग कायमस्वरूपी दुष्काळी, त्यात वन्यप्राण्यांचा त्रास असल्याने शेती कसायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. या प्रकाराने शेतकरी अधिकच कर्जाच्या खाईत लोटला जात आहे. खरीप पिकांचे हे हाल आहेत, तर रब्बी हंगामात याहूनही कठीण परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे. या जंगलातील वन्यप्राण्यांची संख्या झपाट्याने वाढत असल्यामुळेशेतशिवारात त्यांचा वावर वाढत चालला आहे. परिसरात रोही, रानडुक्कर माणसांना तर सोडा श्वानांनाही घाबरत नाहीत, शेतीपिकांच्या नासधुशीसोबतच वन्यप्राणी शेतकऱ्यांवर हल्लेही चढवत आहे. रानडुकरांच्या हल्ल्यात अनेक शेतकरी जखमी झाले. त्याची नोंदही वनविभागाकडे आहे. काही शेतकरी, महिला, मजुरांना हल्ल्यात अंपगत्व आले आहे. यातील काहींना शासकीय मदत मिळाली, तर काही अजूनही शासकीय मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

**टॉवर हेच माकडांचे घर**

तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शेतशिवार महावितरणच्या उच्च दाब वीज वाहिनीच्या टॉवरने व्यापला गेला आहे, याच टॉवरवर आता माकडांनी ठाण मांडले आहे. जणूकाही टॉवर हेच त्यांचे घर असल्याचे दिसून येत आहे. शेतकरी शेताबाहेर पडताच शेतातील उभ्या पिकांची वाट लावतात. खरिपातील पिके उद्धवस्त करून आता रब्बीतील चणा पिकाला माकडांच्या टोळ्यांनी लक्ष्य केले आहे. शेतात चणा पिकाचे माकड मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहेत. आता शेताची राखण करावी की, इतर कामे करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

# मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षणाची मागणी; मुंबई-नागपूर पदयात्रा अमरावतीत दाखल, नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ३ अमरावती**

मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण तसेच अनुसूचित जाती उपवर्गीकरण (अ-ब-क-ड) तात्काळ लागू करण्याच्या मागणीसाठी निघालेली मुंबई ते नागपूर भव्य पदयात्रा आज अमरावतीत दाखल झाली. लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक-अध्यक्ष विष्णुभाऊ कासबे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या पदयात्रेला अमरावतीकरांनी मोठ्या उत्साहाने स्वागत करून भक्कम साथ दिली.

समाजावर सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्तरावर होणारी उपेक्षा तसेच अन्याय वाढत असल्याने स्वतंत्र आरक्षणाची मागणी आता तीव्र होत आहे. सर्वोच्च न्यायालयाने २०१४ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जातीतील १३% आरक्षणाचे अ-ब-क-ड अशा उपविभागात उपवर्गीकरण करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले गेले होते. मात्र, महाराष्ट्र शासनाने आजतागायत त्याची अंमलबजावणी न केल्याचा आरोप समाजनेत्यांनी केला.

याशिवाय मातंग समाजावरील अत्याचारांना आळा घालण्यासाठी विशेष कायदे, दिवंगत समाजसेविका कांताबाई साळवे यांच्या नावाने अध्ययन केंद्र, साहित्यिक डॉ. आनाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' पुरस्कार जाहीर करणे, तसेच समाजातील विद्यार्थ्यांसाठी १००० कोटींच्या शैक्षणिक विकास महामंडळाची स्थापना- अशा महत्त्वपूर्ण मागण्या या पदयात्रेमार्फत शासनापुढे मांडण्यात येत आहेत.

मुंबई-ठाणे मार्गाने सुरुवात झालेली ही पदयात्रा राज्यातील अनेक जिल्ह्यांतून प्रवास करत १० डिसेंबर रोजी नागपूर विधानभवनावर पोहोचणार आहे.

# धक्का लागला तरी गावात होतो राडा तंटा हाय पण समिती नाय!

## ना पदाधिकारी राहिले, ना पुरस्कार, तक्रारी थेट पोलिस ठाण्यात

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

गावातील वाद गावातच मिटावेत आणि गाव शांततेकडून समृद्धीकडे जाण्यासाठी सन २००७ मध्ये राज्य शासनाने महात्मा गांधी तंटामुक्त गात अभियान सुरू करून गावागावांत समित्या स्थापन केल्या होत्या; परंतु या समित्यांकडून आता प्रत्यक्षात अंमलबजावणी होताना दिसत नाही. यामुळे तंटामुक्त गाव समित्या नुसत्या रेकॉर्डलाच राहिल्या आहेत.



गावातील तंटे, वाद गावातच मिटावेत, तर पोलिस आणि न्यायालयात दाखल होणारे खटले कमी करून वेळ आणि पैसा वाचविण्याच्या उद्देशाने शासनाने महात्मा गांधी तंटामुक्त समित्या स्थापन केल्या होत्या. गावातील तंटे, वाद पोलिस ठाण्यात पोहोचण्यापूर्वीच समित्यांकडे जाऊन उभयतांना मान्य असा तोडगा काढून वाद तेथेच मिटविले जायचे. यासाठी शासनाकडून महात्मा गांधी तंटामुक्त योजना प्रभावीपणे अंमलात आणली होती. त्यात उत्कृष्टपणे अंमलबजावणी करणाऱ्या गावांना पुरस्कारही दिले जायचे; परंतु हल्ली राज्यात सत्तांतर झाल्यानंतर या तंटामुक्त समित्या गावातूनच गायब झाल्या असून, आता ना समित्या राहिल्या, ना पुरस्कार; अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तंटामुक्तसमित्या राहिल्या नसल्याने पोलिसांवरही ताण वाढला आहे. १०० टक्के तंटामुक्त गावांना पुरस्कारही देण्यात आले होते. मात्र, सरकार बदलले आणि तंटामुक्त गाव समित्या व अध्यक्ष नावापुरतेच राहिले.

**ना समित्या राहिल्या, ना पुरस्कार**

तंटामुक्त समितीचे सदस्य मनोभावे गावाच्या विकासाठी झटत होते.गावाला तंटामुक्त मोहिमेचा पुरस्कार मिळाल्यावर त्या पुरस्काराची रक्कम गावाच्या विकासाठी खर्च होत होती. परंतु, ही मोहीम बंद झाल्याने आता पुरस्कार तर सोडा समित्याही कागदावरच आहेत.

**तंटामुक्त समित्या झाल्या निष्क्रिय**

आता महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेसंदर्भात शासन दक्ष नसल्याने समित्याही निष्क्रिय झाल्या आहेत. आर. आर. पाटील यांच्या बरोबरच तंटामुक्त मोहीम संपली, असे लोक आता गृहीत धरू लागले. वर्षाकाठी लाखो तंटे सामोपचाराने मिटविले जायचे आणि वेळ व पैशांची बचत होत असताना तंटामुक्त गाव योजना शासनाने बंद केल्याने पुन्हा पोलिस व न्यायालयावरील कामाचा ताण वाढू लागला आहे.महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीने तंटे सोडविण्याबरोबर गावात अवैध धंदे चालणार नाही, गावात अवैध धंदे करणाऱ्यांना तंबी देऊन त्यांना सन्मानाच्या रोजगाराकडे वळविले होते.परंतु, तंटामुक्त योजना बंद करून शासनाने क्राइम व अवैध धंदे वाढविण्यासाठी मूकसंमती दिल्याचा समज मोहीम राबविणाऱ्या सदस्यांचा झाला आहे.

# सीसीआयच्या अटीमुळे कापूस उत्पादक सापडले अडचणीत

## अट शिथील करण्याची परिसरातील शेतकऱ्यांनी केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

सीसीआयने कापूस खरेदी सुरू केल्यानंतर शेतकरी मोठ्या प्रमाणात कापूस विक्रीसाठी कापूस खरेदी केंद्रात नेत आहे. मात्र, १२ टक्क्यांतर कापसात ओलावा असेल, तर कापूस खरेदी केंद्रात कापूस घेण्यास नकार देत असल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे.अनेक वर्षांपासून शासन नाफेडमार्फत सोयाबीनची सीसीआयमार्फत कापसाची हमी भावाने खरेदी करते. खरेदी करताना यात ८ ते १२ टक्के ओलावा असेल, तर शेतकऱ्याचा माल कापूस केंद्रावर खरेदी केला जातो. मात्र, १२ टक्क्यांवर ओलावा असलेल्या कापसाची खरेदी करण्यासाठी कापूस खरेदी केंद्रामध्ये नकार दिला जात आहे. त्यामुळे नाईलाजास्तव शेतकऱ्यांना आपला शेतमाल खासगी व्यापाऱ्यांना विकावा लागत आहे. १२ टक्क्यांवर ओलाव्याची अट शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. ही अट शिथील करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.सीसीआच्या जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना आपला कापूस मागेल त्या भावात खासगी व्यापाऱ्यांना विकावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. अतिवृष्टीमुळे बेजार झालेल्या शेतकऱ्यांवर आधीच कर्जाचा डोंगर उभा झाला आहे. त्यामुळे आता खरीपाच्या लागवडीसाठी घेतलेले कर्ज, मुलाचे शिक्षण, वर्षांचे आर्थिक नियोजन कसे करावे, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे.



**खासगी व्यापाऱ्यांना विकावा लागतो कापूस**

यावर्षी पावसाळ्यात अतिवृष्टी झाली. पाऊस सतत येत राहिला. परिणामी पाऊस गेल्यावर शेतातील वरची जमीन कडक झाली. जमिनीला भेगा पडल्या. पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाला. कापसाच्या झाडांची मुळे ही खूप खोलवर जातात, त्यामुळे कापसाच्या पिकात यंदा ओलावा आहे. तसेच, सोयाबीनची कापणी व मळणी भर पावसात झाली. त्यामुळे सोयाबीनमध्येही ओलावा अधिक प्रमाणात आहे. जागेच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना वाळवणे शक्य नाही. पिके विक्रीला नेल्यानंतर यंत्राने मोजली जाते. तेव्हा, ७० टक्के शेतकऱ्यांच्या मालातील ओलावा १२ टक्क्यांपेक्षा अधिक भरतो. परिणामी हा माल कापूस केंद्रात खरेदी करण्यास नकार देऊन परत केला जातो. शेतकऱ्यांना माल पुन्हा घरी आणणे शक्य होत नसल्याने नाईलाजास्तव त्यांना आपला माल तेथीलच खासगी व्यापाऱ्यांना मागेल त्या भावाने विकावा लागतो. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

## मतदान झाले : उमेदवार, मतदार संभ्रमात; तर्कवितर्कांना उधाण : कोण येणार, कोण हरणार चर्चा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

नगरपरिषद निवडणुकीसाठी मंगळवारी झालेल्या मतदानाला मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासून दुपारी तीन वाजेपर्यंत मतदान सुरळीत सुरू होते, तर त्यानंतर अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा दिसून आल्या. मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी निकालाबाबत उमेदवारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला असून, शहरात तर्कवितर्कांना सुरुवात झाली आहे.

कोणाचे पारडे जड, कोण जिंकणार, कोण हरणार, याबाबत मतदारांमध्येहीचर्चा रंगू लागल्या आहेत. या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ७ 'ब'मध्ये मतदान स्थगित करण्यात आले होते. त्यामुळे एक नगराध्यक्ष आणि २५ नगरसेवकपदांसाठी मतदान झाले. पर ज्यांदा मतदान करणाऱ्या तरुण मतदारांचा उत्साह विशेषतः लक्षवेधी ठरला. नगराध्यक्षपदासाठी काँग्रेस आणि भाजपामध्ये चुरशीची लढत बघायला मिळाली, तर शिंदेसेनेच्या उमेदवाराचीही मतदारांमध्ये चर्चा रंगल्याचे दिसले. बहुतेक प्रभागांत काँग्रेस-भाजपाची सरळ लढत तर काही प्रभागांमध्ये शिंदेसेना आाणि उद्धवसेनेच्या उमेदवारांनी आव्हान उभे केले आहे.

# ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनावर आचारसंहितेचे सावट

**विदर्भ प्रजसत्ताक दि.३नागपूर**



मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याचे आदेश दिल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता २१ डिसेंबरपर्यंत लागू राहणार आहे. याचा परिणाम म्हणून ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विदर्भासाठी होणाऱ्या घोषणांवर मर्यादा येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यातील काही नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाने २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलल्या असून त्यांची मतमोजणी २१ डिसेंबरला होणार आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर आता सर्वच नगरपालिका आणि नगरपंचायतींची मतमोजणी याच दिवशी होणार असल्याने ४ डिसेंबरपासून शिथिल होणारी आदर्श आचारसंहिता आता २१ डिसेंबरपर्यंत लागू राहील.

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळी झालेल्या नागपूर करारानुसार राज्याची उपराजधानी नागपूर येथे वर्षातून एकदा विधिमंडळाचे अधिवेशन घेण्याची प्रथा आहे. विशेषतः हिवाळी अधिवेशन नागपुरात भरते. या अधिवेशनात विदर्भातील प्रश्नांवर चर्चा होऊन त्यावर उपाययोजना जाहीर करण्याचा पद्धतशीर प्रघात आहे. विशेषतः शेतकऱ्यांचे प्रश्न, सिंचन सुविधा, मानव-वन्यप्राणी संघर्ष, औद्योगिक मागासलेपण, विदर्भाचा अनुशेष दूर करणे आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या मुद्द्यांवर चर्चेनंतर घोषणा केल्या जातात. अलिकडच्या काळात या घोषणा 'पॅकेज'च्या स्वरूपात केल्या जात आहेत.यंदा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून पीकविमा रकमेचे व नुकसानभरपाईचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. त्यामुळे धान, सोयाबीन, कापूस उत्पादकांसह संत्रा बागायतदारांचेही लक्ष या अधिवेशनाकडे लागले आहे. मात्र नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांचे निकाल लांबल्याने आचारसंहिता देखील वाढणार आहे. परिणामी हिवाळी अधिवेशनात मोठ्या घोषणा होण्यावर मर्यादा येण्याची चिन्हे आहेत.यामुळे या अधिवेशनात विदर्भाला अपेक्षित घोषणा मिळणार नाहीत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. शिवाय अधिवेशन अल्पकालीन ठरण्याची शक्यता असून आचारसंहितेमुळे ते एका आठवड्यात गुंडाळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अमरावतीत गुन्हे शाखेची धडक कारवाई! पर्यावरणासाठी घातक चायना मांजा विकणारा युवक रंगेहाथ अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**




अमरावती शहरात पर्यावरणाला घातक आणि शासनाने प्रतिबंधित केलेल्या चायना मांजाची विक्री करणाऱ्या इसमावर अमरावती शहर गुन्हे शाखेने धडक कारवाई केली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या आदेशावरून पथकाने गुप्त बातमीदार नेमून ही कारवाई केली.

गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंगदरम्यान पोलीस आयुक्तालय हद्दीत असताना गुप्त माहिती मिळाली की एक व्यक्ती ऑक्सिजन पार्कसमोर चायना मांजाच्या चक्रींची विक्री करत आहे. पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता एक युवक प्लॅस्टिकच्या पोत्यासह संशयित स्थितीत दिसला. त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव कुलदिपसिंग बलवीरसिंग टांक (वय २५, रा. सुदर्शन नगर, वडाळी) असे सांगितले.

त्याच्याकडे असलेल्या पोत्याची तपासणी केली असता मोनोकाईट फायटर व मोनोफिल गोल्ड या कंपन्यांच्या चायना मांजा च्या एकूण ४५ नग चक्री, किंमत ४५,००० रुपये असा मुद्दामाल आढळला. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व बीएनएस कलम ४९, २२३(बी) सह कलम ५ अंतर्गत फेजरपुरा पोलीस स्टेशनमध्ये आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त श्याम घुगे, उपायुक्त रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, संग्राम भोजने, विकास गुडधे, मिर्झा नईम बेग, योगेश पवार, संदीप खंडारे यांनी सहभाग घेतला.

# सोमेश्वर पुसतकर स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत आल्हाद काशीकर यांचे व्याख्यान

## स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

स्व.दत्तात्रय पुसतकर शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय नांदगाव पेठ यांच्या वतीने महाविद्यालयाचे प्रेरणास्थान सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ शुक्रवार दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता पुणे येथील सुप्रसिद्ध वक्ते श्री आल्हाद काशीकर यांचे 'तारुण्य,जीवन आणि प्रेरणा' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ परिसरातील सोमेश्वर पुसतकर सभागृह याठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.



सोमेश्वर पुसतकर यांनी अमरावती शहरात राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण असे कार्यक्रम आयोजित केले आहे. त्यांनी अमरावती शहरात नाविन्यपूर्ण अशा अनेक भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्यांच्या कार्याचा वसा पुढे सुरू ठेवण्याच्या उद्देशाने लोक फाउंडेशन अमरावती,सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळी आणि आणि स्व.दत्तात्रय पुसतकर शिक्षण संस्था यांच्यातर्फे दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. याच कार्यक्रमांतर्गत सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

मूळचे अमरावतीचे रहिवासी आणि सध्या पुणे येथे वास्तव्यात असलेले श्री आल्हाद काशीकर हे अनेक विषयांचे अभ्यासक, उद्योजक ,व्यवस्थापन सल्लागार, मुक्त पत्रकार, कवी, समाजसेवक, गझल गायक असून उत्तम वक्ते आहेत. श्री आल्हाद काशीकर यांचे व्याख्यान अमरावती शहरातील सर्वांसाठी विशेषत: तरुणांसाठी प्रेरणादायी असणार आहे. त्यामुळे सदर व्याख्यानाला अमरावती शहरातील सर्व रसिक श्रोत्यांनी आणि तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष श्रीमती वृषालीताई पुसदकर,उपाध्यक्ष निदानजी बारस्कर,सचिव श्रीकृष्ण बाळापूरे, सहसचिव भूषण पुसदकर,कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर हिवसे, सदस्य रेवण पुसदकर, वैभव दलाल, अनुराग वारेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य विजय दरणे , प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# राज्यात थंडीचा कडाका वाढणार, तब्बल तीन महिने

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३नागपूर**

मोसमी पावसाचा लांबलेला प्रवास आणि त्यानंतर अवकाळी पावसाचा मारा झाल्यानंतर आता थंडीची लाट नागरिकांना सहन करावी लागणार आहे. राज्यात एक नाही तर तब्बल तीन महिने थंडीचा कडाका सहन करावा लागणार आहे. भारतीय हवामान खात्याने तसा इशारा दिला आहे.

नोव्हेंबर महिन्यात कडाक्याच्या थंडीला सुरुवात झाली होती, पण लगेच वातावरणात बदल होऊन किमान तापमानात वाढ झाली. आता पुन्हा गेल्या काही महिन्यांपासून थंडीला सुरुवात झाली आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी या आगामी हिवाळी हंगामात; तसेच डिसेंबर महिन्यात महाराष्ट्रासह मध्य भारतात किमान आणि कमाल तापमान सरासरीइतके किंवा त्यापेक्षा कमी राहण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र खात्याने (आयएमडी) वर्तवला आहे.



यंदाच्या हिवाळ्यात राज्यात थंडीच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यताही भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. हवामान खात्यातर्फे हिवाळ्यातील हवामानाचा अंदाज सोमवारी जाहीर करण्यात आला. यावर्षी महाराष्ट्रासह मध्य भारतात थंडीचा कडाका जाणवण्याचे संकेत भारतीय हवामान खात्याने दिले.

खात्याने दिलेल्या माहितीनुसार, डिसेंबर ते फेब्रुवारी या तीन महिन्यांत मध्य महाराष्ट्र आणि कोकणात किमान तापमान सरासरीच्या दरम्यान, तर मराठवाडा आणि विदर्भात सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. याच कालावधीत राज्याच्या बहुतांश भागांत कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहू शकते.महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगण, मध्य प्रदेश, गुजरात आणि पूर्व राजस्थान या प्रदेशांत यंदाचा हिवाळा तीव्र राहू शकतो. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश हरियाणा येथे थंडीच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा तीन ते पाच दिवस जास्त राहू शकतात. डिसेंबरमध्ये उत्तर महाराष्ट्रात किमान आणि कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता असून, राज्यात इतरत्र किमान तापमान सरासरीइतके राहू शकते.

या महिन्यात मराठवाड्यात थंडीच्या लाटांचे दिवस सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. पूर्व किनारपट्टी, गुजरात, मध्य महाराष्ट्र, कोकणाचा उत्तर भाग आणि बिहार येथे डिसेंबरमध्ये पाऊस सरासरीइतका किंवा त्यापेक्षा जास्त राहण्याची शक्यताही भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे.

# खबरदार! भाडेकरार नोंदणी न केल्यास घरमालक-भाडेकरू दोघांनाही ५ हजारांचा दंड

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ३ अमरावती**

घर भाड्याने देणारे आणि घेणारे या दोघांसाठी महत्त्वाची बातमी. केंद्र सरकारने देशभरात 'नवीन भाडे करार २०२५' लागू केला असून, यामुळे भाडेपट्टा व्यवस्थेत पारदर्शकता आणि शिस्त येणार आहे. या नियमांनुसार आता प्रत्येक भाडेकरार ६० दिवसांच्या (दोन महिन्यांच्या) आत नोंदणी करणे बंधनकारक ठरणार आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास घरमालक आणि भाडेकरू दोघांनाही किमान ५,००० दंड भरावा लागणार आहे.




**भाडे थकवल्यास घरमालकाला अधिकार**

भाडेकरूने सलग दोन महिने भाडे थकवल्यास, हे करारभंग मानून घरमालक थेट विशेष भाडे लवादाकडे तक्रार दाखल करू शकतो. यामुळे दीर्घकाळ भाडे न देणाऱ्या भाडेकरूंवर निर्बंध येणार आहेत.

**वाद ६० दिवसांत निकाली**

घरमालक-भाडेकरू यांच्यातील वाद आता वर्षानुवर्षे लांबणार नाहीत. नवीन कायद्यानुसार अशा तक्रारी ६० दिवसांतच निकाली काढाव्या लागणार आहेत आणि लवादाचा निर्णय दोन्ही पक्षांसाठी बंधनकारक असेल.

**भाडेकराराची नोंदणी कशी?**

भाडेकराराची नोंदणी राज्य सरकारच्या पोर्टलवर डिजिटल स्टॅम्पसह ऑनलाइन किंवा रजिस्ट्रार कार्यालयात करता येणार आहे. आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असल्यास ही प्रक्रिया सुलभ होणार आहे.

**भाडेवाढ आणि नोटीसची नवीन अट**

भाडेवाढ वर्षातून एकदाच करता येईल आणि यासाठी २० दिवस आधी नोटीस देणे आवश्यक आहे. घरमालकाला कराराची मुदत पूर्ण होण्यापूर्वी किंवा कायदेशीर कारणांशिवाय भाडेकरूला बेदखल करता येणार नाही.

**कायद्याचे उद्दिष्ट**

या नव्या भाडेकरार कायद्यामुळे घरमालक आणि भाडेकरू यांचे हक्क व जबाबदाऱ्या स्पष्ट होणार असून, दोघांमधील वाद आणि गैरसमज लक्षणीयपणे कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत